रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १८ ◆ अंक ११२
www.ramprahar.com

◆ रविवार, ९ नोव्हेंबर २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अकोल्यातील दोन विद्यार्थ्यांचा काशीद समुद्रात बुडून मृत्यू



**मुरूड** : प्रसिद्ध पर्यटनस्थळ असलेल्या मुरूडमधील काशीद येथे सहलीसाठी आलेल्या अकोल्यातील दोन विद्यार्थ्यांचा समुद्रात बुडून मृत्यू झाल्याची घटना शनिवारी (दि. ८) घडली. अकोला येथील तीन शिक्षक आणि १२ विद्यार्थ्यांची सहल आली होती. या वेळी काही मुले सायंकाळी काशीद समुद्र किनारी पोहण्यासाठी गेली. यातील आयुष रामटेके, राम खुटे व आयुष बोबडे तीन विद्यार्थी किनाऱ्यापासून दूर गेले व पाण्यात डुबक्या खाऊ लागले. त्यापैकी आयुष व राम यांचा मृत्यू झाला, तर आयुषला वाचवण्यात जीवरक्षकाला यश आले. सर्वजण इयत्ता बारावीचे विद्यार्थी आहेत. आयुषवर शासकीय रुग्णालयात उपचार सुरू असून त्याची प्रकृती स्थिर आहे. याबाबत अधिक तपास मुरूड पोलीस करीत आहेत. दरम्यान, पर्यटन हंगामाच्या सुरुवातीलाच अशी दुर्दैवी घटना घडल्याने हळहळ व्यक्त होत आहे.

अंतरंग

'नवी मुंबईतही विकसकाशिवाय स्वयंपुनर्विकास शक्य'/२

रविवारनिमित्त विविध विषयांवरील लेख/४

ऑस्ट्रेलियाविरुद्धची टी-२० मालिका भारताने जिंकली/८

# रायगड भाजप कोअर कमिटीची बैठक

## मंत्री आशिष शेलार यांच्याकडून निवडणुकांसंदर्भात मार्गदर्शन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्ह्यात भारतीय जनता पक्षाने स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मोर्चेबांधणीला सुरुवात केली आहे. जिल्ह्यात सर्वप्रथम १० नगर परिषदांच्या निवडणुका जाहीर झाल्या आहेत. त्या अनुषंगाने राज्याचे मंत्री तथा भाजपचे रायगड संपर्क प्रमुख आशिष शेलार यांच्या उपस्थितीमध्ये उत्तर आणि दक्षिण रायगड भाजपच्या कोअर कमिटीची बैठक शनिवारी (दि. ८) पनवेल मार्केट यार्डमधील श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात झाली.

या बैठकीला भाजप रायगड निवडणूक प्रभारी आमदार प्रशांत ठाकूर, दक्षिण रायगड निवडणूक प्रमुख सतीश धारप, दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष खासदार धैर्यशील पाटील, आमदार रविशेठ पाटील, आमदार महेश बालदी, आमदार विक्रांत पाटील, ज्येष्ठ नेते जे.एम. म्हात्रे, बाळासाहेब पाटील, उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, सरचिटणीस नितीन पाटील, ॲड. प्रकाश बिनेदार, आस्वाद पाटील, दीपक बेहेरे, राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, ॲड. महेश मोहिते, पनवेल महापालिकेचे माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे आदी उपस्थित होते.

या वेळी नगरपालिका निवडणुकांसंदर्भात मंत्री आशिष शेलार यांनी मार्गदर्शन व सूचना केल्या तसेच तयारीचा आढावा घेतला.

रायगडचे निवडणूक प्रभारी आमदार प्रशांत ठाकूर यांनी, प्रबळरित्या ही निवडणूक लढवली पाहिजे या दृष्टिकोनातून भाजपची पूर्ण तयारी आहे तसेच जिथे जिथे शक्य असेल तिथे महायुती म्हणूनच निवडणुकीला सामोरे जाऊ, असे नमूद केले.

### 'भाजप महायुती सज्ज'

राज्याचे मंत्री तथा भाजपचे रायगड संपर्क प्रमुख आशिष शेलार यांनी रायगड जिल्ह्यातील निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर भाजपच्या तयारीबाबत प्रसारमाध्यमांशी बोलताना माहिती दिली. रायगडचे निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर तसेच उत्तर आणि दक्षिण जिल्हाध्यक्ष व कोअर कमिटीसोबत संघटनात्मक चर्चेचा सविस्तर आढावा घेतल्याचे त्यांनी सांगितले. महायुती हाच आमचा ठाम पवित्रा असून विरोधी पक्षाला फायदा होणार नाही अशा पद्धतीने काही रचना आणि व्यवस्था करावी लागली, तर आम्ही त्यासाठीही खुले आहोत, असे मंत्री शेलार यांनी स्पष्ट केले.



राज्यभरात एकाच वेळी होणाऱ्या निवडणुकांसाठी संघटनेची पडताळणी, फॉलोअप आणि फीडबॅकची प्रक्रिया पूर्ण झाली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली ही संपूर्ण प्रणाली कार्यरत असून निवडणूक व्यवस्थापनासाठी आवश्यक असलेल्या कार्यशाळाही नुकत्याच घेण्यात आल्या. उमेदवारांच्या नावांच्या निवड प्रक्रियेची कार्यपद्धती पक्षातील पदाधिकाऱ्यांना स्पष्ट करण्यात आली आहे. आता सर्व स्तरांवर महायुतीमधील मित्रपक्षांशी चर्चा, उमेदवारांची पडताळणी, प्रचार साहित्य, जाहीरनाम्यांची तयारी आणि प्रचाराच्या योजनांना वेग मिळणार आहे. या सर्व घटकांवर अंतिम निर्णय घेण्यासाठी ११ नोव्हेंबर रोजी सकाळी ९ वाजता मुख्यमंत्र्यांच्या वर्षा बंगल्यावर महत्त्वाची बैठक होणार असल्याचेही मंत्री शेलार यांनी सांगितले.

# आधुनिक तंत्रज्ञान काळाची गरज -लोकनेते रामशेठ ठाकूर

### सातारा येथे शैक्षणिक दौरा





**सातारा : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्था आणि जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या संयुक्त विद्यमाने सातारा येथे एक महत्त्वाचा व ज्ञानवृद्धी करणारा अभ्यास दौरा शुक्रवारी (दि. ७) यशस्वीरित्या पार पडला. 'रयत'चे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या सहकार्याने आणि उपस्थितीत हा दौरा आयोजित करण्यात आला होता. या वेळी त्यांनी आधुनिक तंत्रज्ञान ही काळाची गरज असल्याने प्रतिपादन केले.

सद्यस्थितीत अद्ययावत तंत्रज्ञानाचा प्रसार आणि प्रचार वाढवणे ही काळाची गरज आहे. हीच बाब लक्षात घेऊन रयत शिक्षण संस्थेच्या इतर विद्यालयांमध्ये आधुनिक तंत्रज्ञान कशा प्रकारे चालते याचा अभ्यास करण्यासाठी तसेच ज्ञानाची देवाण-घेवाण करण्याच्या उद्देशाने हा अभ्यास दौरा आयोजित करण्यात आला होता. प्राचार्य व शिक्षकांच्या उपस्थितीत हा आगळावेगळा अभ्यास दौरा झाला.

या दौऱ्यात खंडाळा (जि. सातारा) येथील सुशीला शंकर गाडवे महाविद्यालय आणि साताऱ्यामधील कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग या दोन प्रमुख महाविद्यालयांना भेट देण्यात आली तसेच खंडाळ्याच्या महाविद्यालयात 'गुरुजी' अटल टिंकरिंग लॅबचे निरीक्षण करण्यात आले. प्रा. डॉक्टर भावना आंबूडकर यांनी लॅबची माहिती दिली. येथे आधुनिक तंत्रज्ञानाचा सुयोग्य वापर आणि विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर घालणारे आगळेवेगळे प्रकल्प दाखवण्यात आले, तर सातारा येथील अभियांत्रिकी महाविद्यालयात रिसर्च सेंटर, रोबोटची निर्मिती, थ्री डी प्रिंटर, थ्री डी स्कॅनर, सीएनजी मशीन्स व प्रोग्रामबल ड्रोनर यांसारख्या अद्यावत मशीन्सचे कार्य दाखवले गेले.

या वेळी एक्झिक्यूटिव्ह राहुल घरत यांनी मोलाचे मार्गदर्शन केले तसेच प्राचार्य ए.सी. आत्तार, डॉ.वाय.के. कानसे, डॉ. आनंद तापसे, प्रा.ए.ए. महादार, प्रा.गणेश दांगट, डॉ.वानते, प्रा.सुप्रिया, आर.ए. पाटील यांनी मार्गदर्शन केले.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी मार्गदर्शन करताना म्हटले की, आपल्या विद्यार्थ्यांना अधिकाधिक आधुनिक तंत्रज्ञान मिळाले पाहिजे आणि त्यांच्यापर्यंत या सर्व सुविधा पोहचवणे हे आपले प्रथम कर्तव्य आहे. आधुनिक तंत्रज्ञान ही काळाची गरज असल्याने अशा टिंकरिंग लॅब आपल्या विद्यालयातही असायला हव्यात.

या अभ्यास दौऱ्यात प्राचार्य स्वप्नाली म्हात्रे, मुख्याध्यापिका मुक्ता खटावकर, प्राचार्य निशा नायर, प्राचार्य अनुराधा काठे, प्राचार्य सायली वालावलकर, प्राचार्य किरण सुथार सहभागी झाले होते. हा अभ्यास दौरा सर्वच विद्यालयांसाठी एक मार्गदर्शनपर ज्ञानाचा खजिना ठरला असून भविष्यात या अभ्यास दौऱ्याचे अतिशय अनुकूल परिणाम पहायला मिळतील, असे सर्व प्राचार्य व शिक्षकांनी सांगितले.

# पनवेलमध्ये अधिवक्ता कार्यशाळा उत्साहात

**पनवेल** : अधिवक्ता परिषद रायगड आणि पनवेल वकील संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी (दि. ८) अधिवक्ता कार्यशाळा २०२५ पनवेल शहरातील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात आयोजित करण्यात आली होती. राज्याचे माहिती तंत्रज्ञान आणि सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार आणि आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थिती या कार्यशाळेला लाभली. या वेळी महाराष्ट्र विशेष जनसुरक्षा कायद्यावरील मुद्दे आणि त्याची पार्श्वभूमी यावर मंत्री ॲड. शेलार यांनी उपस्थितांसोबत सखोल संवाद साधला. (पान २ वर..)



## निवडक

### संसदेचे हिवाळी अधिवेशन १ डिसेंबरपासून होणार सुरू

**नवी दिल्ली** : संसदेचे हिवाळी अधिवेशन येत्या १ डिसेंबरपासून सुरू होणार आहे. संसदीय कार्यमंत्री किरेन रिजिजू यांनी समाजमाध्यमावरच्या पोस्टद्वारे ही माहिती दिली. १९ डिसेंबरपर्यंत चालणाऱ्या या अधिवेशनात लोकशाही बळकट करणे आणि सामान्य नागरिकांच्या आकांक्षा पूर्ण करण्याच्या दृष्टीने सकारात्मक चर्चा व्हावी, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली आहे.

### 'स्थानिक' निवडणुकांसाठी प्रमुख प्रचारकांची संख्या दुप्पट

**मुंबई** : स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांच्या प्रचारासाठी राजकीय पक्षांच्या प्रमुख प्रचारकांची संख्या २०वरून वाढवून ४० करण्यात आली आहे. अनेक दिवसांपासून विविध पक्षांकडून ही मागणी होत होती. राजकीय पक्षांना प्रमुख प्रचारकांची यादी संबंधित जिल्हाधिकारी किंवा महानगरपालिका आयुक्त यांच्याकडे सादर करावी लागेल.

# शेतकऱ्यांना सर्वतोपरी मदत करणार

## केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान यांची बीडमध्ये ग्वाही

**बीड : प्रतिनिधी**

शेतकऱ्यांच्या जीवनात बदल घडवण्यासाठी सरकारचे प्रयत्न सुरू आहेत. महाराष्ट्रातील अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारने मदतीचे पॅकेज दिले आहे. केंद्राचे पथकही येऊन गेले. शेतकऱ्यांना मदत करण्यात कुचराई करणार नाही, त्यांना सर्वतोपरी मदत केली जाईल, अशी ग्वाही केंद्रीय कृषीमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी दिली.



बीड जिल्ह्यातील सिरसाळा (ता. परळी) येथील ग्लोबल विकास ट्रस्टच्या माध्यमातून शुक्रवारी (दि.७) शेतकरी संवाद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्याला केंद्रीय कृषीमंत्री चौहान मार्गदर्शन करीत होते. ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष जलनायक मयंक गांधी, केंद्रीय कृषी सहसचिव अजितकुमार साहू, राज्याचे कृषी आयुक्त सूरज मांढरे, विभागीय कृषी सहसंचालक सुनील वानखेडे, विक्रमकुमार, रवी झुनझुनवाला, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. इंद्रमणी, श्री. वंगे आदींची प्रामुख्याने उपस्थिती होती.

केंद्रीय कृषीमंत्री चौहान म्हणाले, शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च कमी करून उत्पादन वाढविण्याला प्राधान्य आहे. उत्तम बियाणे उपलब्ध व्हावे याकडे कटाक्ष आहे. अतिवृष्टी, दुष्काळ अशा दोन्ही विरोधाभासी स्थितीत तग धरणारे व जास्त उत्पादन देणारे पीक येण्यासाठी बियाणे उपलब्ध करण्यावर भर देत आहोत. नकली बियाणे व इतर शेतीविषयक निविष्ठा विकणाऱ्यांची गय केली जाणार नाही.

प्रक्रिया उद्योग उभारून शेतीमालाला दर कसा मिळवून देता येईल यावरही प्रयत्न सुरू आहेत. जिथे जास्त बाजार भाव आहे, अशा कुठल्याही बाजारपेठेत शेतकऱ्याने आपला माल विक्रीस नेला तर त्यासाठीचे वाहन भाडे सरकार देईल, अशी मदत करण्याची योजना आणण्याचा विचार सुरू आहे. एकाच पिकावर अवलंबून न राहता एकात्मिक पीक पद्धतीकडे तसेच शेतीला पूरक उद्योग जोडण्याकडे शेतकऱ्यांना वळावे लागेल, याकडेही केंद्रीय कृषिमंत्र्यांनी या वेळी लक्ष वेधले.

शेतकऱ्यांशी थेट संवाद या मेळाव्याचे खास आकर्षण ठरले ते केंद्रीय कृषीमंत्री चौहान यांनी व्यासपीठावरून खाली उतरून थेट शेतकऱ्यांशी साधलेला संवाद. त्यांना भेटण्यासाठी शेतकऱ्यांची मोठी झुंबड उडाली होती. उपस्थित शेतकऱ्यांनी मी शेतकरी, मीच माझ्या जीवनाचा शिल्पकार असा उल्लेख असलेल्या पांढऱ्या टोप्या परिधान केल्या होत्या आणि कृषीमंत्रीही तीच टोपी परिधान करून शेतकऱ्यांमध्ये मिसळून गेले.

### 'दुष्काळी भागात मनरेगाचा ६५ टक्के निधी पाण्यासाठी वापरू'

शेतीसाठी पाणी महत्त्वाचे आहे. ज्या ठिकाणी पाण्याची टंचाई आहे, त्या ठिकाणी मनरेगाचा ६५ टक्के निधी केवळ पाणी जमिनीत साठविण्यासाठी खर्च केला जाईल, अशी व्यवस्था करू, अशी घोषणा केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी या वेळी केली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली शेतकरी सुखी व समृद्ध करण्याचा संकल्प राबवला जात आहे. शेतकरी सुखी, तर देश सुखी राहणार आहे. अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचा एक-एक रुपया शेतकऱ्यांना दिला जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

# मालदार बॅरल्स कंपनीतील कामगारांच्या लढ्याला यश

## आमदार प्रशांत ठाकूर यांचे मानले आभार



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

तळोजा एमआयडीसीतील मालदार बॅरल्स कंपनीमधील कामगारांच्या न्यायासाठी सुरू असलेला दीर्घ लढा अखेर यशस्वी ठरला. कंपनीकडून मिळणाऱ्या कायदेशीर देण्यांची अंमलबजावणी झाल्याने कामगारांमध्ये समाधानाची भावना असून या विजयात आमदार प्रशांत ठाकूर यांनी दिलेल्या ठाम सहकार्याचा मोठा वाटा असल्याचे कामगारांनी स्पष्ट केले.

महाराष्ट्र कामगार संघटनेच्या माध्यमातून हा लढा सातत्याने लढवण्यात आला. अनेक बैठकांपासून चर्चांपर्यंत संघटनेचे अध्यक्ष सागर राजे व सहकाऱ्यांनी घेतलेली मेहनत अंतिम टप्प्यात निर्णायक ठरली. या संपूर्ण प्रक्रियेनंतर कृतज्ञतेची भावना व्यक्त करण्यासाठी कामगार प्रतिनिधी मंडळाने आमदार प्रशांत ठाकूर यांची भेट घेतली व त्यांचे मनापासून आभार व्यक्त केले.

या भेटीदरम्यान आमदार प्रशांत ठाकूर यांनी महाराष्ट्र कामगार संघटनेच्या नेतृत्वाचे विशेष कौतुक केले. सागर राजे आणि त्यांच्या टीमने घेतलेल्या कष्टांमुळे हा न्याय मिळाल्याचे ते म्हणाले. कामगारांचे अभिनंदन करत त्यांनी पुढील वाटचालीत न्याय्य हक्कांसाठी जागरूक राहण्याचा आणि संघटितपणे उभे राहण्याचा मोलाचा सल्ला दिला.

या वेळी कामगारांच्या चेहऱ्यावर एक प्रकारचा दिलासा आणि दीर्घ लढ्यानंतर मिळालेल्या न्यायामुळे समाधानाची झळाळी दिसत होती. तळोजा एमआयडीसीतील या घडामोडीमुळे कामगार चळवळीला नवे बळ मिळाल्याची भावना व्यक्त होत आहे.

## न्यायाची भाषा नागरिकांना सहज समजण्याइतकी सोपी असावी -पीएम मोदी

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

न्यायाची भाषा ही सामान्य नागरिकांना सहज समजण्याइतकी सोपी असावी, असे मत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी (दि.८) व्यक्त केले. नवी दिल्लीत सर्वोच्च न्यायालयात कायदेशीर मदत पोचवण्याची प्रक्रिया बळकट करण्याविषयीच्या राष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटन समारंभात ते बोलत होते.

गेल्या तीन वर्षांत सरकारच्या सहाय्याने लोक अदालत आणि खटला दाखल होण्यापूर्वीच मध्यस्ती करून कायदेशीर सहाय्य यंत्रणांनी आठ लाखापेक्षा जास्त प्रकरणे सोडवल्याचा उल्लेख पंतप्रधान मोदींनी केला.

न्यायालयीन सहाय्य म्हणजे देशबांधणीत योगदान देणे आहे, असे प्रतिपादन सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई यांनी केले. लोकांच्या जीवनात परिवर्तन आणण्याचे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्वप्न साकार करणे हेच न्यायालयीन सहाय्य चळवळीचे ध्येय असल्याचे ते म्हणाले, तर तरुणांनी न्यायदानाकडे फक्त एक औपचारिक जबाबदारी म्हणून नाही, तर एक नागरिक-केंद्रित सेवा म्हणून बघावे, असे आवाहन कायदा आणि न्यायमंत्री अर्जुन राम मेघवाल यांनी केले.

# 'भाजपचा नवा राष्ट्रीय अध्यक्ष लवकरच होणार जाहीर'



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

केंद्रीय संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी भारतीय जनता पक्षाला पुढचे राष्ट्रीय अध्यक्ष कधी मिळणार याबाबत महत्त्वाची माहिती दिली आहे. बिहार विधानसभा निवडणुका संपल्यानंतर पक्षाला नवीन अध्यक्ष मिळेल, असे त्यांनी सांगितले. याबरोबरच पक्षात कोणताही मतभेद नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

गेल्या काही दिवसांपासून भाजपच्या नवीन राष्ट्रीय अध्यक्षांच्या नावाबद्दल चर्चा सुरू आहेत. यादरम्यान एका वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत केंद्रीय मंत्री राजनाथ सिंह म्हणाले की, बिहार विधानसभा निवडणुकीनंतर तुम्हाला पुढील भारतीय जनता पक्षाच्या अध्यक्षाबद्दल ऐकायला मिळेल. आमच्या पक्षात कोणताही वाद नाही. या वेळी त्यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची भूमिकादेखील स्पष्ट केली आणि पक्षाच्या राजकीय निर्णयांवर त्याचा प्रभाव असल्याच्या चर्चाही फेटाळून लावल्या. ते म्हणाले, आरएसएस कधीही भाजपच्या राजकीय कामात हस्तक्षेप करत नाही. मी लहानपणापासूनच आरएसएसशी जोडलेला आहे. संघ हा देशभक्तीचा संस्कार देतो.

दरम्यान, पुढील राष्ट्रीय अध्यक्ष भारतीय जनता पक्षाचे १२वे अध्यक्ष असणार आहेत. जेपी नड्डा पहिल्यांदा २०१९मध्ये कार्यवाह अध्यक्ष बनले आणि त्यानंतर २०२०मध्ये अधिकृतपणे त्यांची निवड करण्यात आली. नुकतेच नड्डा यांना केंद्रीय मंत्रिमंडळात आरोग्य आणि रसायने तसेच खतेमंत्री म्हणून स्थान देण्यात आले आहे. तेव्हापासून हे पद रिक्त असून लवकरच पक्षाला नवा अध्यक्ष मिळणार आहे.

केंद्रीय मंत्री राजनाथ सिंह यांनी बिहारमध्ये सुरू असलेल्या निवडणुकांबद्दल भाष्य केले. त्यांनी सत्ताधारी एनडीए पुन्हा एकदा सत्तेत येईल, असा विश्वास व्यक्त केला. ते म्हणाले, जनतेच्या प्रतिक्रिया पाहून आम्हाला वाटतंय की, आम्ही सरकार स्थापन करू आणि आम्हाला दोन तृतीयांश बहुमत मिळू शकते.

# नवी मुंबईतही विकासकाशिवाय स्वयंपुनर्विकास शक्य -आ. दरेकर




**नवी मुंबई : बातमीदार**

मुंबईपेक्षा स्वयं पुनर्विकासाची जास्त गरज नवी मुंबईला आहे. नवी मुंबईत वसलेला रहिवाशी कष्टकरी, गिरणी कामगार, माथाडी कामगार आहे. इथे उंच टॉवरमध्ये राहणारा रहिवाशी नाही. ९०-९५ टक्के लोकं मध्यमवर्गीय आहेत. नवी मुंबईत विकासकाशिवाय स्वयं पुनर्विकास शंभर टक्के यशस्वी होऊ शकतो. परंतु निर्धार करण्याची गरज आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्र गृहनिर्माण स्वयं/समूह पुनर्विकास प्राधिकरणाचे अध्यक्ष आमदार प्रविण दरेकर यांनी शनिवारी केले आहे. नवी मुंबईतील सेक्टर ३ येथील महात्मा ज्योतिबा फुले सभागृहात नवी मुंबई को-ऑप.हौसिंग फेडरेशनतर्फे पुनर्विकास व स्वयं पुनर्विकास विषयावर परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला आ. प्रविण दरेकर हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. याप्रसंगी नवी मुंबई को-ऑप.हौसिंग फेडरेशनचे अध्यक्ष सुनिल चौधरी, सचिव भास्कर म्हात्रे, श्रीप्रसाद परब, संचालक प्रमोद जोशी,संचालक सतीश निकम,संचालिका छाया म्हात्रे यांसह मोठ्या संख्येने गृहनिर्माण संस्थांचे प्रतिनिधी, नवीमुंबईकर नागरिक उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना आ. प्रविण दरेकर म्हणाले कि, हा कार्यक्रम नवी मुंबईसाठी महत्वाचा आहे. आपला उत्साह पाहिल्यावर स्वयं पुनर्विकास ही नवी मुंबईकरांची गरज असल्याचे दिसून येतेय. स्वयं पुनर्विकास आज होत नाही. मी फक्त त्याला आकार देण्याचे काम केलेय. विकासकाच्या हातात गेलेला भाग सभासदांच्या हातात आणण्यासाठी शासकीय योजना उभी केली. स्वयं पुनर्विकासाला रचनात्मकसाच्यात बसविण्याचे काम मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मदतीने मी करत असल्याचेही दरेकर म्हणाले. दरेकर पुढे म्हणाले की, मुंबई बँकेच्या माध्यमातून मुंबईत ही योजना सुरु केली, कर्ज धोरणही आणले. राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी सुरुवातीच्या काळात स्वतः लक्ष घालून शासन दरबारी परवानग्या देण्याचे काम केले. जिथे जिथे अडचणी आल्या तिथे मुख्यमंत्री फडणवीस यांनी फोन केले. अशा प्रकारे २-३ प्रकल्प यशस्वी झाले. परंतु कायदा, शासन निर्णय होणे गरजेचे होते. यासाठी गोरेगाव येथे हौसिंगची परिषद घेतली. त्या परिषदेत तत्कालीन उपमुख्यमंत्री व गृहनिर्माण मंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे १८ मागण्या केल्या. त्यापैकी १६ मागण्या मान्य करत त्याचे शासन निर्णयही जारी केले व या स्वयं पुनर्विकासाला खरी गती मिळाली. त्यामुळे ही योजना स्थिरावल्याचेही दरेकर म्हणाले. तसेच मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्वयं/समूह पुनर्विकास प्राधिकरणाची जबाबदारी माझ्यावर सोपवली आहे. त्याला मंत्रीपदाचा दर्जाही दिला आहे. नुकतीच म्हाडा कार्यालयात सिडकोचे प्रश्न सोडविण्याबाबत बैठक पार पडली. नवी मुंबईत स्वयं पुनर्विकास योजना राबविण्यासाठी ९०-९५ टक्के सिडकोच्या अधिकाऱ्यांनीही मान्यता दिली आहे. या बैठकीचे मिनिट्स सरकारला जाणार असून नवी मुंबईकरांसाठी चांगला सकारात्मक निर्णय होणार आहे. चांगले काम हातात घेतले तर टप्प्याटप्प्याने यश मिळते. आपणच आपला विकास करून मोठी जागा मिळवायची. यासाठी अनेक सोसायट्यांनी पुढे आले पाहिजे. जी मदत, सहकार्य लागेल ती निश्चितपणे प्राधिकरणाच्या माध्यमातून करू, असा विश्वासही दरेकरांनी यावेळी दिला.

दरम्यान, महाराष्ट्र गृहनिर्माण स्वयं/समूह पुनर्विकास प्राधिकरणाच्या अध्यक्ष पदी आमदार प्रविण दरेकर यांची नियुक्ती करण्यात आल्याने नवी मुंबई को-ऑप हौसिंग फेडरेशनच्या वतीने त्यांचा जाहीर सत्कारही करण्यात आला.

शरद पवारांनाही स्वयं पुनर्विकासाचे कुतूहल

दरेकर म्हणाले कि, स्वयं पुनर्विकास हे महाराष्ट्रात क्रांतिकारी पाऊल आहे. दोन दिवसांपूर्वी कोल्हापुरात एका कार्यक्रमासाठी गेलो असता तिथे ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी जवळ बोलावून स्वयं पुनर्विकास, त्याची प्रक्रिया आणि लोकांना होणाऱ्या फायद्याबाबत विचारणा केली. त्यांना मी सर्व समजावून सांगितले. त्यांनी पुस्तिका पाठवण्याचे सांगितले असता मी स्वतःच पुस्तिका घेऊन येईन असे म्हटले.

एवढे कुतूहल स्वयं पुनर्विकासविषयी लोकांना आहे. विकासकाशिवाय सोसायटी उभी राहते व सर्वसामान्यांना मोठे घर मिळते हा हौसिंग सेक्टरमधील चमत्कार असल्याचेही दरेकर म्हणाले.

## पनवेल महापालिका माझी वसुंधरा अभियान पर्यावरणदूतांची निवड



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेच्या वतीने माझी वसुंधरा अभियान ६.० अंतर्गत आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली पर्यावरणाचे संरक्षण करण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाबद्दल जागरूकता निर्माण करणे आणि शाश्वत विकासासाठी विद्यार्थ्यांना व युवकांना प्रेरित करण्याच्या उद्देशाने पर्यावरण दूतांची निवड करण्यासाठी महापालिकेच्या विविध शाळांमध्ये नुकताच विशेष जनजागृती उपक्रम राबविण्यात आला. या अभियानांतर्गत पनवेल महानगरपालिका शाळां मध्ये परिसंवादाचे आयोजन करण्यात आले. या सत्रांमध्ये पर्यावरण संवर्धन, हवामान बदल साक्षरता आणि स्वच्छतेचे महत्त्व याबद्दल विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली.

या उपक्रमाद्वारे प्रत्येक शाळेतून विद्यार्थ्यांची पर्यावरण दूत म्हणून निवड करण्यात आली. पनवेल महानगरपालिकेसोबत विविध पर्यावरणीय उपक्रम, स्वच्छता मोहिमा आणि जनजागृती कार्यक्रमांमध्ये सहभाग घेणार आहेत.

## वाहतूक नियमांबाबत नवीन पनवेल शाखेच्या वतीने विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

**पनवेल : वार्ताहर**



पनवेल तालुक्यातील आजिवली येथे जनता विद्यामंदिरात नवीन पनवेल वाहतुक शाखेच्या वतीने वाहतुक नियमांचे पालन करण्याबाबत विद्यार्थ्यांना प्रबोधन करण्यात आले.

जनता विद्यामंदिर , अजिवली, ता पनवेल येथे नवीन पनवेल वाहतुक शाखेच्या वतीने विद्यार्थी यांना वाहतुक नियमाचे माहिती देऊन वाहतूक नियमाचे पालन करणेबाबत प्रबोधन करण्यात आले. यावेळी त्यांना गाडी चालवताना सीट बेल्ट लावणे, दारू पिऊन गाडी चालवू नये, लेन कटिंग करू नये, वाहन चालवताना मोबाइल फोन चा वापर करू नये.

उलट्या दिशेने वाहने चालवू नयेत, वाहने रोडवर पार्क करू नयेत, विद्यार्थी तसेच विद्यार्थिनी यांनी लायसन येत नाही तोपर्यंत कोणताही वाहन चालू नये, यांच्यासह सर्व वाहतुकीचे नियम आपल्या पालकांना समजावून सांगणे असे विद्यार्थ्यांना आवाहन करण्यात आले

तसेच वाढत्या सायबर गुन्हेगारी बद्दल माहिती देऊन इंटरनेट वापरताना घ्यावयाची काळजी, सायबर गुन्हे आणि प्रकार , मोबाईल वापरताना घ्यावयाची काळजी, सायबर हेल्पलाइन १९३०, लैंगिक अपराधापासून बालकाचे संरक्षण संरक्षण कायदा, बालविवाह कायदा आणि बालविवाहाचे दुषपरिणाम याबद्दल माहिती देऊन बालविवाह होऊ नयेत असे आवाहन केले.

तसेच पोलीस मदतीची आवश्यकता असल्यास ११२ या पोलीस हेल्पलाइन बद्दलची माहिती व. पो. नि. प्रकाश सकपाळ, पो हवा संजय गावडे यांनी दिली. यावेळी १६० विद्यार्थी आणि शिक्षकवर्ग उपस्थित होते.

## पनवेल महापालिकेच्या शाळांमध्ये बालसभेसह विविध उपक्रमांचे आयोजन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगर पालिका आयुक्त श्री. मंगेश चितळे यांच्या सुचनेनुसार आज शुक्रवार दिनांक ७ ऑक्टोबर रोजी विद्यार्थी दिवसनिमित्त पनवेल महानगर पालिका च्या सर्व शाळां मध्ये बालसभांचे व विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

अतिरिक्त आयुक्त ( शिक्षण) महेश मेघमाळे, उपायुक्त (शिक्षण) नानासाहेब कामठे, सहा. आयुक्त (शिक्षण) रुपाली माने, शिक्षणाधिकारी रमेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनानुसार सर्व शाळांमध्ये विद्यार्थी दिवस निमित्त बालसभांचे आयोजन करून भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यांच्या जीवन कार्याविषयी माहिती देण्यात आली तसेच शाळांमध्ये त्यांच्या जीवनावर आधारित माहितीपट दाखविण्यात आले.

यावेळी शाळांमध्ये निबंध स्पर्धा,वक्तृत्त्व स्पर्धा व काव्य वाचन स्पर्धा यांचे यशस्वी आयोजन करण्यात आले.

विद्यार्थी दिवस उपक्रमाचे यशस्वी आयोजन केल्यामुळे शिक्षणाधिकारी रमेश चव्हाण यांनी सर्वांचे कौतुक केले.

## पक्षी सप्ताहानिमित्त जागरूकता कार्यक्रम

**पनवेल : वार्ताहर**




राज्यातील जैवविविधतेचे संरक्षण व संवर्धनाच्या दृष्टीने निसर्गातील प्रत्येक घटकाचे महत्त्व विशद व्हावे, लोकजागृती व्हावी या उद्देशाने ज्येष्ठ पक्षी निरीक्षक तथा साहित्यिक मारुती चितमपल्ली यांचा वाढदिवस ५ नोव्हेंबर व दिवंगत डॉ. सलीम अली यांची जयंती १२ नोव्हेंबर याचे औचित्य साधत ५ नोव्हेंबर ते १२ नोव्हेंबर हा आठवडा पक्षी सप्ताह म्हणून साजरा केला जातो.

जगभरातील पक्ष्यांची जैवविविधता झपाट्याने कमी होत असून अनेक पक्षी प्रजाती दुर्मीळ श्रेणीत समाविष्ट होत आहेत. राज्यातील पक्ष्याचे महत्त्व प्रत्येक नागरिकांपर्यंत पोहोचवून त्यांच्या संरक्षणाप्रती जबाबदारी स्पष्ट व्हावी या विषयी शासन स्तरावर, महाराष्ट्र पक्षीमित्र संघटना तसेच वेगवेगळ्या संस्थांच्या माध्यमातून या सप्ताह मध्ये पक्षी निरीक्षण, पक्ष्यांविषयी जागरूकता स्पर्धांचे आयोजन तसेच शाळा - कॉलेज या ठिकाणी पक्षी जनजागृती कार्यक्रमांचे आयोजित केले जातात.

याच हेतूने नेचर फ्रेन्ड सोसायटी पनवेल, ग्रीन वर्क्स ट्रस्ट आणि वनपरिक्षेत्र पनवेल परिमंडळ पोयंजे यांच्या संयुक्त विद्यमानने जनता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यामंदिर, अजिवली - पनवेल येथील विद्यार्थ्यांना दिनांक ८ नोव्हेंबर २०२५ रोजी पक्षी संवर्धन व पक्षी विषयी रंजक माहिती देण्यात आली. ग्रीन वर्क्स ट्रस्ट चे संस्थापक, पक्षी अभ्यासक डॉ. निखिल भोपळे यांनी विद्यार्थ्यांना समजेल अशा सोप्या शब्दांत पक्षी विषयी मार्गदर्शन केले.

पान १ वरुन

## पनवेलमध्ये अधिवक्ता कार्यशाळा उत्साहात





देशभरातील दुर्गम भागांतून सुरू झालेला नक्षलवाद आता शहरी भागात फ्रंटल ऑर्गनायझेशनच्या माध्यमातून पोहचला आहे. न्यायालयीन परिभाषेत माओवादी कडवे-डावे म्हणून ओळखल्या जाणाऱ्या गटांनी नवीन चेहऱ्यातून समाजातील भावनांचा गैरवापर करून दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला. या पार्श्वभूमीवर अशा संघटनांवर बंदी आणण्याची आवश्यकता सर्वोच्च न्यायालयाने अधोरेखित केली असून केंद्र सरकारनेही त्याबाबत महत्त्वपूर्ण सूचना दिल्या आहेत. नागरिकांच्या अभिप्रायांपासून ते संयुक्त विधेयक समितीपर्यंत व्यापक विचारविनिमय करून महाराष्ट्र सरकारने महाराष्ट्र विशेष जनसुरक्षा कायदा तयार केला असल्याचे मंत्री ॲड. शेलार यांनी सांगितले. या कायद्याचे संविधानिक अधिष्ठान, देशहिताशी असलेली सांगड आणि मानवी सुरक्षेच्या दृष्टीने असलेले महत्त्वही त्यांनी सविस्तरपणे नमूद केले.

अधिवक्ता परिषद रायगड आणि पनवेल वकील संघटना वर्षभर विविध उपक्रम राबवत नागरिकांना दिशा देत असल्याचे नमूद करत आमदार प्रशांत ठाकूर यांनी दोन्ही संघटनांचे कौतुक केले.

या कार्यशाळेला भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, महाराष्ट्र गोवा बार कौन्सिलचे माजी अध्यक्ष व सदस्य ॲड. पारिजात पांडे, अधिवक्ता परिषद कोकण प्रांत पालक ॲड. दीपक गायकवाड, अध्यक्ष ॲड. संजीव गोरखाडकर, सचिव ॲड. रेखा कांबळे, रायगड जिल्हा अध्यक्ष व जिल्हा सरकारी वकील ॲड. संतोष पवार, अकोला प्रांत अधिवक्ता परिवार सचिव ॲड. मीराम नेसर, पनवेल अध्यक्ष ॲड. राजेंद्र देशमुख, पनवेल वकील संघटनेचे अध्यक्ष ॲड. मनोज भुजबळ, सचिव ॲड. प्रल्हाद खोपकर आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## उरण एज्युकेशन स्कूलला आदर्श शाळा पुरस्कार

**पनवेल : वार्ताहर**



समाजसेवा हीच खरी ईश्वर सेवा हे ब्रीद वाक्य घेऊन आजवर चाईल्ड केअर सामाजिक संस्था आदर्श शाळा तालुका हा उपक्रम हाती घेऊन रायगड जिल्हातील प्रत्येक तालुक्यात आदर्श शाळा निवडत आहे. त्याप्रमाणे उरण एज्युकेशन स्कूलला आदर्श शाळा पुरस्कार देण्यात आला.

पुरस्कार यूईएसचे मानद सचिव ॲड. राजेंद्र भानुशाली व प्राचार्य सिमरन दहिया यांनी स्वीकारला. कार्यक्रमास ॲड. विजेंद्र पाटील, चेतन पाटील, शाळेतर्फे समन्वयक मितेश पुरारकार, पर्यवेक्षिका सोनाली म्हात्रे, योगिता चौधरी, नैना सिंग, रेश्मा वैद्य, पत्रकार मिलिंद खारपाटील, विठ्ठल ममताबादे, दिनेश पवार, पालक प्रतिनिधी अनुश्री पाटील, सरिता गुप्ता, संस्थेचे संस्थापक अध्यक्ष विकास कडू, कार्याध्यक्ष मनोज ठाकूर, कोषाध्यक्ष रोशन घरत, सदस्य रोशन धुमाळ, अभिषेक माळी, विवेक कडू आदी उपस्थित होते. या वेळी पुरस्काराबद्दल भानुशाली यांनी आभार मानले.

## चिरनेर येथे विषारी नागाला सर्पमित्राकडून जीवदान



**उरण : प्रतिनिधी**

उरण तालुक्यातील चिरनेर येथील दत्तात्रेय म्हात्रे यांच्या शेतशिवारातील बांधावर असलेल्या जाळ्यात भक्ष्याच्या शोधात आलेला साधारणता पाच सहा फूट लांबीचा विषारी नाग जाळ्यात अडकून पडला होता. स्थानिक सर्पमित्र जयवंत ठाकूर यांना शेतावर विषारी नाग असल्याची माहिती शेतकरी कृष्णा म्हात्रे यांच्याकडून मिळताच, त्यांनी घटनास्थळ गाठले. आणि जयवंत ठाकूर यांनी या विषारी नागाची जाळ्यातून सोडवणूक करून त्याला जीवदान दिले. साधारणतः सहा फूट लांबीचा हा विषारी नाग रात्रीच्या वेळी भक्ष्याच्या शोधात आला असावा. मात्र शिकार करण्या आधीच तो जेरबंद झाल्याने जाळ्यात निपचित पडला होता.

मात्र सर्पमित्र जयवंत ठाकूर यांनी या विषारी नागाची सुटका करून त्याला जीवदान दिले. त्यानंतर त्याला उरण तालुका वनविभागाच्या निर्देशानुसार सुरक्षित चिरनेर वनक्षेत्रात सोडून देण्यात आले.

## आधुनिक प्रलोभनांपासून सावध रहा -डॉ. ओंकार माटे

**नवी मुंबई: प्रतिनिधी**

पुणे विद्यार्थी गृहाच्या नेरुळ येथील विद्याभवन शिक्षण संकुलात सर्व विद्यार्थी आणि पालकांसाठी आयोजित करण्यात आलेल्या व्याख्यानात प्रसिद्ध मानसोपचारतज्ज्ञ डॉ. ओमकार माटे यांनी पालकांना मोबाईलपासून दूर होऊन आपल्या पाल्यांशी संवाद साधण्याचा आणि प्रलोभनांपासून सावध होण्याचा कानमंत्र दिला.

दीर्घकाळ टिकणारी कोणतीही गोष्ट दीर्घकाळ परिश्रम करूनच मिळवावी लागते. झटपट मिळणाऱ्या गोष्टी तात्पुरत्याच टिकतात. गुणवत्ता, अभ्यास, यश, प्रसिद्धी, पैसा या सर्वांना हे लागू आहे. पालकांचे विद्यार्थी अनुकरण करतात. पालकांनी मोबाईल आणि सोशल मीडियापासून दूर होऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधावा. शारीरिक, मानसिक आणि कौटुंबिक स्वास्थ्य टिकेल यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करावे. स्पर्धेच्या युगात प्रलोभनापासून दूर रहावे. प्रसारमाध्यमे मुलांवर दडपण निर्माण करतात. आपल्या अपेक्षांचे ओझे लादून आपण फक्त तणाव निर्माण करणे टाळावे, असा सल्ला डॉ. ओंकार माटे यांनी सर्व उपस्थितांना दिला. व्याख्यानानंतर डॉ. माटे यांनी पालकांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तरे दिली. यावेळी सर्व शिक्षक, विद्यार्थी व पालक उपस्थित होते.



# सामान शिफ्ट करताना दागिने चोरणाऱ्यांना अटक



**पनवेल : वार्ताहर**

सामान शिफ्ट करण्याच्या बहाण्याने दागिने लंपास करणाऱ्या दुकलीला पनवेल शहर पोलिसांनी ताब्यात घेऊन चोरीचे ९० टक्के दागिने हस्तगत केले आहेत. सुदर्शन शिंगाडे यांच्या करंजाडे येथील घरातील सामान हे करंजाडे ते नवीन पनवेल तक्का येथे शिफ्टिंग करण्याचे काम आरोपी संदीपकुमार जैस्वाल (वय २४ रा. कांदिवली) व त्याच्या सहकारी गौरव शुल्का (वय २८ रा. मालाड० याना दिले असता त्यांनी आपसात संगनमत करून घरातील सामान पॅकिंग करत असतात घरातील लाकडी कपाटामध्ये एका डबी मध्ये ठेवलेलं सोन्याच्या अंगठ्या, कानातील रिंग, सोन्याचे मणी व देवींची मूर्ती असा लाखो रुपये किमतीचा ऐवज लंपास केला होता.

याबाबतची माहिती सुदर्शन शिंगाडे याना मिळताच त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानुसार वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक फडतरे, पोलीस हवालदार अमोल पाटील, पोलीस शिपाई विशाल दुधे पोलीस नाईक सुभाष राठोड आदींच्या पथकाने गुप्त बातमीदार व तांत्रिक तपासद्वारे या दोन्ही आरोपीना मुंबई येथून ताब्यात घेतले असून त्याच्या कडून चोरीच्या गुन्यातील मोठ्या प्रमाणात सोनायचे दागिने हस्तगत केले आहेत. याबाबत पुढील तपास पोना सुभाष राठोड करीत आहेत.

## निवडक

### रेल्वेच्या धडकेने इसमाचा मृत्यू

**पनवेल :** सोमाटणे रेल्वे स्टेशनजवळ रेल्वेच्या धडकेने एका इसमाचा मृत्यू झाला असून त्याच्या नातेवाईकांचा शोध पनवेल तालुका पोलीस करीत आहेत. सदर बेवारस मयत इसम यास सोमाटणे रेल्वे स्टेशन जवळे रेल्वेने धडक दिल्याने बेशुद्ध अवस्थेत मिळून आल्याने त्यास उपजिल्हा रुग्णालय, पनवेल, जि. रायगड येथे उपचार कामी दाखल केले असता त्यास डॉक्टरांनी दाखल पूर्व मयत घोषित केले आहे. सदर बेवारस मयत इसमाचे मृत्यूबाबत पनवेल तालुका पोलिस ठाणे, येथे तक्रार नोंद आहे. तरी सदर बेवारस मयत इसमाचे नातेवाईक यांचा शोध झीळ गणेश मोकाशी मो. नं.८६६८४८१४१४ आणि पोहवा. धनाजी तांडेल मो. नं. ९५९५७९५५७७ यांच्याशी संपर्क साधावा.

### जगदीश ठाकूर उपतालुकाप्रमुखपदी



**पनवेल :** हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या आशीर्वादाने व शिवसेना मुख्य नेते उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच खासदार श्रीरंग बारणे यांच्या आदेशानुसार जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे यांनी जगदीश ठाकूर यांची शिवसेना उपतालुकाप्रमुखपदी नियुक्ती केली आहे. याबाबतचे नियुक्तीपत्र खासदार बारणे व जिल्हाप्रमुख शेवाळे यांनी ठाकूर यांना दिले.

### अमृत महोत्सवानिमित्त शुभेच्छा

**पनवेल :** दानशूर व्यक्तिमत्व, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्ष पदार्पणानिमित्त गायक गोपाळ पाटील व सहकाऱ्यांची संगीत मॅरेथॉन नुकतीच पनवेल येथील आद्यक्रांतिवीर वासुदेव फडके नाट्यगृहात झाली. या वेळी मंगल गाणी शेरोशायरी, सेक्टर १३ नवीन पनवेल यांच्या वतीने डी.टी. बागवे, वैशाली गोडे, तुकाराम आवटे, जया गरुडे, सागर शिर्के, माजी सचिव सुरेश नाईक यांनीही उपस्थित राहून लोकनेते रामशेठ ठाकूर यांना शुभेच्छा दिल्या.

### हवामानात बदल; थंडीची चाहूल

**उरण :** लांबलेल्या पावसाने निरोप घेतला असून गारेगार थंडीची चाहूल लागली आहे. विशेषकरून ग्रामीण भागात सकाळी तसेच सायंकाळी तापमानाचा पारा घसरत असून रात्रीच्या वेळी सुखद गारवा जाणवू लागला आहे.

## वंदे मातरम् गीताला १५० वर्षे पूर्ण; खारघरमध्ये सामूहिक गीत सादरीकरण



**खारघर : रामप्रहर वृत्त**

'वंदे मातरम' या राष्ट्रीय गीताला १५० वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने आज रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल, खारघर येथे भव्य सामूहिक गीत सादरीकरणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या उपक्रमात शाळेतील विद्यार्थी, शिक्षकवर्ग तसेच खारघर मंडल भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि विविध सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने सहभागी झाले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी विद्यार्थ्यांनी वंदे मातरम् हे राष्ट्रीय गीत समूहात सादर केले. या प्रसंगी उपस्थित मान्यवरांनी देशभक्ती, राष्ट्रीय एकात्मता आणि भारतीय संस्कृतीतील मातृभूमीप्रेम यावर आपले विचार मांडले. या कार्यक्रमाला भाजपा उत्तर रायगड जिल्हा सचिव ब्रिजेश पटेल, भाजपा खारघर मंडल अध्यक्ष प्रविण पाटील, मंडल सरचिटणीस दीपक शिंदे, सरचिटणीस ॲड. नरेश ठाकूर, जिल्हा उपाध्यक्ष समीर कदम, तसेच किरण पाटील, नीलेश बाविस्कर, अमर उपाध्याय, वासुदेव पाटील, कीर्ति नवघरे, संध्या शारबिद्रे, संजय घरत,निर्मला यादव, प्रिया दळवी, जुमा चक्रबर्ती, रजनी शर्मा, दुर्गा अंजुरे, सविता घाटोले, राजवंत रायत, त्रापति चोवारे, मीनाक्षी अंथवाल, प्रवीण बेरा, आदित्य हातगे, राहुल शिंदे, रामचंद्र पाटील, संजय शर्मा, आनंद झाने, सुरेश कुमार, सर्जे राव मेंगाणे, विश्वनाथ इंडी आदी मान्यवर उपस्थित होते. या प्रसंगी सर्व उपस्थितांनी 'वंदे मातरम' या गीताने दिलेल्या देशभक्तीच्या संदेशाचा पुन्हा एकदा सन्मानपूर्वक उच्चार केला आणि राष्ट्रीय एकात्मतेचा संकल्प दृढ केला.

## रामशेठ ठाकूर महाविद्यालयात इंग्रजी भाषा व संप्रेषण कौशल्यावर विशेष सत्र

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात शनिवार , दि. ८ नोव्हेंबर रोजी सकाळी ११.०० वाजता वाणिज्य विभागातर्फे इंग्रजी भाषा आणि संप्रेषण कौशल्य या विषयावर विशेष सत्राचे आयोजन करण्यात आले होते.

या सत्राचा उद्देश महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमध्ये इंग्रजी भाषेचे ज्ञान वृद्धिंगत करणे, प्रभावी संवाद कौशल्य विकसित करणे तसेच शैक्षणिक आणि व्यावसायिक क्षेत्रात आत्मविश्वास वाढविणे हा होता. या कार्यक्रमासाठी प्रमुख वक्ते म्हणून ए.सी अभियांत्रिक महाविद्यालय खारघर येथील इंग्रजी विभागाचे प्रमुख प्रा. रतन कांबळे यांनी उपस्थित राहून महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना इंग्रजी भाषेचे आजच्या जागतिक युगातील महत्त्व पटवून दिले तसेच लेखन, वाचन, श्रवण आणि संभाषण या चारही भाषिक कौशल्यांचा सराव कसा करावा याबाबत मार्गदर्शन केले तसेच व्यावसायिक संवाद, सादरीकरण कौशल्य, ई-मेल लेखन आणि मुलाखतीतील प्रभावी संवाद या विषयांवर प्रात्यक्षिकांसह सत्र पार पडले.

महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे यांनी या सत्राचे आयोजन केल्याबद्दल वाणिज्य विभागातील सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे अभिनंदन केले व शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाचे आयोजन प्रा. डॉ. महादेव चव्हाण यांनी केले तसेच वाणिज्य विभागप्रमुख प्रा. विशाल देशमुख, प्रा. राहुल कांबळे, प्रा. तनुजा सुमन, प्रा. प्रमोद वाघे व महाविद्यालयातील विद्यार्थी आणि शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचारी यांनी उपस्थित राहून सहकार्य केले.

या कार्यक्रमाद्वारे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभवातून इंग्रजी संवाद कौशल्य सुधारण्याची संधी मिळाली.



# सीकेटी महाविद्यालयात वंदे मातरम् गीताचा सार्ध शताब्दी सोहळा उत्साहात



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारत देशाच्या स्वतंत्र्यता चळवळीत महत्वपूर्ण योगदान देणारे तथा प्रत्येक भारतीय नागरिकामध्ये राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण करणारे वंदे मातरम् हे गीत बंकिमचंद्र चटोपाध्याय द्वारा ०७ नोव्हेंबर १८७५ रोजी रचले गेले, सदर गीतास १९५० रोजी राष्ट्रीय गीत म्हणून मान्यताप्राप्त झाली. या गीताच्या रचनेस ०७ नोव्हेंबर २०२५ रोजी १५० वर्षे पूर्ण होत असताना देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून व भारत सरकारच्या सांस्कृतिक मंत्रालयाच्या पुढाकाराने देशभरात वंदे मातरम् गीताचे सामुहिक गायन करण्याच्या सूचना निर्गमित करण्यात आल्या होत्या. याच धर्तीवर महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चांगू काना ठाकूर आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, न्यू पनवेल (अधिकारप्रदत्त स्वायत्त) च्या राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि महाराष्ट्रभूषण डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी औद्योगिक प्रशिक्षण संस्था पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने सीकेटी महाविद्यालयाच्या भव्य प्रांगणात शुक्रवार, दि. ०७ नोव्हेंबर रोजी वंदे मातरम् गीताचे सामुहिक गायन तथा सार्ध शताब्दी समारोहाचे दिमाखदार आयोजन करण्यात आले.

या समारोहाच्या अध्यक्षस्थानी पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर तर मुख्य अतिथी म्हणून पनवेल महानगरपालिकेचे आयुक्त मंगेश चितळे, पनवेलचे उपविभागीय अधिकारी तथा दंडाधिकारी पवन चांडक यांची प्रमुख उपस्थिती राहिली. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून पनवेल तहसीलदार मीनल भोसले, पनवेल महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त गणेश शेट्ये, उपायुक्त तथा परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे, उपायुक्त डॉ. वैभव विधाते, उपायुक्त प्रसेनजीत कार्लेकर, उपायुक्त रविकिरण घोडके, उपायुक्त सौरभ खर्गे, सहाय्यक आयुक्त रुपाली माने, शिक्षणाधिकारी रमेश चव्हाण, पनवेल शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अभिजित अभंग, प्रवीण कदम, शिवछत्रपती पुरस्कार विजेते संजय कडू आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरवात भारतमातेच्या प्रतिमेने झाली, पनवेल महानगरपालिकेचे आयुक्त मा. श्री. मंगेश चितळे यांनी भारतमातेच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करत त्यास अभिवादन केले, तद्नंतर सर्व मान्यवरांच्याहस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. औपचारिक स्वागत समारोहामध्ये सीकेटी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो.डॉ. एस.के.पाटील आणि पनवेल आय.टी. आय. चे प्रभारी प्राचार्य विजय टीकोले यांच्याहस्ते व्यासपीठावरील मान्यवरांचे स्वागत झाल्यानंतर पनवेल तालुक्याच्या तहसीलदार मा. मीनल भोसले यांनी प्रास्ताविक सादर करताना वंदे मातरम् गीताची पार्श्वभूमी स्पष्ट करत त्याचे महत्व विशद केले. सर्व उपस्थित विद्यार्थी समूहास संबोधित करताना त्यांनी राष्ट्रीय गीतामधील महत्वपूर्ण घटकांचे आणि संकल्पनांचे तार्कीकपणे विश्लेषण केले.

प्रास्ताविकाचे संबोधन झाल्यानंतर पनवेल आय.टी.आय. मधील विद्यार्थीनिंनी आपल्या सुमधुर वाणीतून भारताचे राष्ट्रीयगीत वंदे मातरम् गीताचे गायन केले. यासोबतच व्यासपीठावरील उपस्थित सर्व मान्यवर, व्यासपीठासमोरील विद्यार्थी जनसमुहाने एक ताल आणि सुरात वंदे मातरम् गीताचे सामुहिक गायन केले व संपूर्ण वातावरण राष्ट्रभक्तीच्या भावनेने अभिभूत झाले.

राष्ट्रीय गीताच्या सामुहिक गायनानंतर समारोहाचे मुख्य वक्ते विवेक विचारमंचाच्या कोंकण प्रांताचे संयोजक विजय वेदपाठक यांनी सर्व सहभागी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना वंदे मातरम् गीताचा इतिहास सांगितला, यासोबत १८५७ चे पहिले स्वातंत्र्य समर, मातृशाक्तीचा जागर, राष्ट्रीय गीतच्या माध्यमातून भारतभूमीचे समर्पक पद्धतीने केलेले वर्णन आदींचा उल्लेख करत, कोणत्याही देशाच्या नागरिकाने त्याच्या देशाला मातेचा दर्जा देणारे एकमेव राष्ट्र म्हणजे भारत राष्ट्र असल्याचे प्रतिपादन केले.

कार्यक्रमाचे मुख्य अतिथी यांनी सर्व विद्यार्थ्यांशी हितगुज साधत वंदेमातरम् गीतामधील प्रत्येक नैतिक मूल्याचा आणि संकल्पनेचा अर्थ समजून एक जबाबदार नागरिकांप्रमाणे आपली सर्व कर्तव्ये यथायोग्य पद्धतीने पार पाडण्याबाबत भाष्य केले. सरतेशेवटी श्री. डी.डी. विसपुते महाविद्यालय, विचुंबे च्या चमूने पथनाट्याच्या माध्यमातून धर्म, जात, प्रांत, भाषा यांपासून वर येत आपण प्रथमतः भारतीय आहोत असा संदेश दिला. कार्यक्रमाची सांगता पनवेल आय. टी.आय. चे मा. दीपक बाग्कर यांच्या आभार प्रदर्शनाने झाली. तर सूत्रसंचालन महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे मुख्य कार्यक्रम अधिकारी प्रा. आकाश पाटील यांनी केले.

सदर कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सीकेटी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय सेवा योजनेचे अध्यक्ष डॉ. राजेश येवले, मुख्य कार्यक्रम अधिकारी प्रा. आकाश पाटील, कार्यक्रम अधिकारी प्रा. आलोक भानुशाली, प्रा. सुशीलकुमार घाडगे, एन.एस. एस. विषय समन्वयक प्रा. रुपेश माने. यासोबतच पनवेल आय.टी. आय. चे प्रभारी प्राचार्य मा. श्री. विजय टीकोले नेतृत्वाखाली यांच्या समवेत त्यांच्या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारीवर्ग आणि स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले.

## डॉ. जय डिगोळे भाजप कामोठे शहर मंडळ चिटणीसपदी

**पनवेल : वार्ताहर**

सामाजिक कार्यकर्ते डॉ. जय डिगोळे यांची भाजपा कामोठे मंडळ चिटणीसपदी नियुक्ती झाली. आमदार प्रशांत ठाकूर यांच्या आदेशाने एका कार्यक्रमात त्यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले.

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली कामोठे येथे पार पडलेल्या एका कार्यक्रमात जिल्हा सचिव नितिन पाटील, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, कामोठे मंडल अध्यक्ष विकास घरत, माजी मंडळ अध्यक्ष रवींद्र जोशी, युवा नेते सुशील शर्मा यांच्या प्रमुख उपस्थितीत डॉ. डिगोळे यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले.



डॉ. डिगोळे सामाजिक क्षेत्रात कार्यरत आहेत. त्यांनी विद्यार्थांचा गुणगौरव व शालेय वस्तूंचे वाटप, नवी मुंबई पोलीस दलातर्फे गडचिरोली येथील आदिवासी व गरीब लोकांना सहकार्य करणाऱ्या उपक्रमात सहभाग तसेच शहरात ग्रंथालय व अभ्यासिका व्हावी यासाठी सिडकोकडे पाठपुरावा केला होता.

## उलवे येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलमध्ये ल्यूमिनॉसिटी २०२५ आंतरशालेय साहित्य स्पर्धा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या उलवे येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलने शनिवारी (दि.८) ल्युमिनोसिटी २०२५ ही आंतरशालेय साहित्य स्पर्धा आयोजित केली होती. संस्थेचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवानिमित्त आयोजित हा उपक्रम वक्तृत्व, सर्जनशीलता आणि बौद्धिक प्रवचनाचा एक नेत्रदीपक संगम ठरला.

कार्यक्रमाची सुरुवात शाळेचे अध्यक्ष भार्गव ठाकूर, संस्थेचे संचालक दर्शन ठाकूर, प्राचार्य किरण कुमार सुथार यांच्या औपचारिक दीपप्रज्वलनाने झाली.





या वेळी शालेय समन्वयक कविता म्हात्रे यांनी प्रत्येक स्पर्धात्मक विभागासाठी नियम आणि वस्तुनिष्ठ निर्णय निकषांची रूपरेषा सांगणारे तपशीलवार सादरीकरण केले. कार्यक्रमाचा समारोप पारितोषिक वितरण समारंभाने झाला. उत्कृष्ट कलाकारांना ट्रॉफी आणि गुणवत्तेचे प्रमाणपत्र देण्यात आले, तर सर्व सहभागींना सहभाग प्रमाणपत्रे देण्यात आली.

समारोपीय भाषणात प्राचार्य किरण कुमार सुथार यांनी विजेत्यांचे अभिनंदन केले आणि स्पर्धेच्या अंमलबजावणीसाठी केलेल्या परिश्रमांबद्दल शिक्षक, समन्वयक आणि स्वयंसेवकांसह संपूर्ण आयोजन यंत्रणेचे कौतुक केले. विद्यार्थी समारंभिका तन्मयी बालन हिने उपस्थितांचे आभार मानले. उपक्रमास प्रतिसाद लाभला.

# लावणीप्रधान चित्रपटाची परंपरा...

## लावणीसम्राट विठाबाई नारायणगावकरांवर चरित्रपट 'ईठा'
















**झूम प्रहर**



**दिलीप ठाकूर**
चित्रपट समीक्षक

मराठी चित्रपटाच्या चौफेर, यशस्वी, बहुरंगी बहुढंगी वाटचालीतील अभिनेत्रीची ठळक वैशिष्ट्यातील एक महत्त्वाची गोष्ट, त्यांची नृत्य निपुणता.विशेषत लावणी नृत्य. यात हंसा वाडकर, जयश्री गडकर तसेच लीला गांधी, उषा चव्हाण, उषा नाईक अशी बरीच नावे घेता येतील.

दिग्दर्शक लक्ष्मण उतेकर आता लावणी सम्राज्ञी विठाबाई नारायणगावकर यांच्या आयुष्यावर आधारित 'ईठा' हा चरित्रपट दिग्दर्शित करीत आहे आणि विठाबाई नारायणगावकर यांच्या भूमिकेसाठी श्रद्धा कपूरला निवडले आहे. श्रद्धाची आतापर्यंतची वाटचाल पाहता ती नृत्यासाठी ओळखली जात नाही. ढोलकीच्या तालावरचे लावणी नृत्य तर फारच दूर. शक्ती कपूरची मुलगी ही तिची पहिली ओळख, पण आपल्या मेहनतीने तिने स्वतःची ओळख निर्माण केली आहे. तिची आई शिवांगी कोल्हापुरे ही महाराष्ट्रीयन. मावशी पद्मिनी कोल्ह्यपुरे. श्रद्धला मराठी बोलता येते हे तिच्या भेटीचा सुखद योग आला असता समजले. उच्चार अतिशय शुद्ध आहेत.

श्रद्धा अतिशय मेहनतीने, कसून सराव करून, दिग्दर्शक आणि नृत्य दिग्दर्शक यांच्या सुचनांचे पालन करीत विठाबाई नारायणगावकर नक्कीच उत्तम साकारेल. एकदा चित्रपट स्वीकारला की पूण व्यावसायिकपणे आपले काम करणे हे आजच्या ग्लोबल युगातील डिजिटल पिढीचे वैशिष्ट्य.

माधुरी दीक्षित 'ईठा' या भूमिकेसाठी एकदम परफेक्ट निवड होईल ना? चित्रपटसृष्टीतीत ती चाळीस वर्षे कार्यरत आहे. लगेचच तिच्या वयाचा मुद्दा अथवा गुद्दा नकोच. आजही ती फिट्ट आहे, तिच्या चेहऱ्यावरचे हास्य कायम आहे. तिची लोकप्रियता कायम आहे. सोशल मीडियात तिचे कोटीत चाहते आहेत. आजही ती नृत्यात पारंगत आहे हे एका जाहिरातीत दिसते, पण आपण म्हणतोय म्हणून एखाद्या सेलिब्रेटीजची निवड करण्यात येत नसते. बरीच व्यावसायिक गणिते असतात. कधी अटी आणि शर्ती असतात. सगळेच जुळून यायला हवे.

मराठी चित्रपटसृष्टीत अनेक नृत्य निपुण अभिनेत्री आहेत. त्यांचा विचार का झाला नाही असा एक प्रश्न असतोच, पण चित्रपट हिंदीत आहे. जगभरातील किमान ऐंशी देशात तो प्रदर्शित होणार आहे. तेव्हा हिंदी चित्रपटसृष्टीला तारका जास्त महत्त्वाची ठरते (सोशल मीडियात काही मिनिटांच्या रिलमध्ये धन्यता मानणे योग्य नाही हे यातून लक्षात घ्यावे).

मराठी चित्रपटसृष्टीतील सर्वोत्तम नृत्य तारका म्हणून बरीच नावे घेता येतील. पूजा सावंत, अमृता खानविलकर, प्राजक्ता माळी, उर्मिला कानेटकर, सोनाली कुलकर्णी, श्रुती मराठे, सायली संजीव, संस्कृती सालगुडे, पल्लवी पाटील ही नावे आवर्जून घ्यायला हवीत.

याच निमित्ताने मराठी चित्रपटातील लावणीच्या प्रवासातील काही गोष्टी सांगायलाच हव्यात. साधारण सतरा अठरा वर्षांपूर्वीची गोष्ट. ग्रामीण भागातील लाऊडस्पीकरवर, शहरातील रेडिओ एफएमवर, टेपरेकॉर्डरवर, शहरापासून तालुक्याच्या ठिकाणावरील इव्हेन्टसमध्ये, वाढदिवसाच्या पार्टीत मला जाऊ द्या ना घरी आता वाजले की बारा, अप्सरा आली... कोमल काया की मोहमाया पूनवचांदनं न्याली... ही लावणी नृत्य गीते सगळीकडेच ऐकायला येऊ लागली आणि त्याच लोकप्रिय गाण्यांच्या वातावरणात रवि जाधव दिग्दर्शित 'नटरंग' (२००९) प्रदर्शित झाला तोच फर्स्ट शोपासूनच सुपर हिट.

पिक्चरची गाणी लोकप्रिय असतील तर जनसामान्यांपर्यंत तो चित्रपट सहज पोहचतो. या दोन गाण्यांनी अमृता खानविलकर व सोनाली कुलकर्णी स्टार झाल्या आणि या यशाची गोड गोड फळे त्याना आजही मिळताहेत. गीतकार गुरू ठाकूर आणि संगीतकार अजय अतुल मुख्य प्रवाहातील म्हणून ओळखले गेले ते अगदी कायमचेच. ही दोन्ही फक्कडबाज लावणी गीते.

चित्रपती व्ही.शांताराम दिग्दर्शित 'पिंजरा' (१९७२)मधील लावणी गीतांनी संपूर्ण महाराष्ट्रात धुमाकूळ घातला होता. आजही 'पिंजरा'तील गाणी अफाट लोकप्रिय आहेत. माधुरी दीक्षितदेखील मराठीतील आपले आवडते गाणे म्हणून दिसला गं दिसला हे सांगते. यात बरेच काही आले.

लावणीप्रधान चित्रपट म्हटल्यावर चित्रपती व्ही. शांताराम दिग्दर्शित राजकमल कलामंदिर निर्मित पिंजरा हा चित्रपट महत्वाचा ठरतो. या चित्रपटातील सात लावणी गीते उषा मंगेशकर यांनी गायलीत आणि संध्या यांनी आपल्या बहारदार नृत्य कौशल्याने त्या रूपेरी पडद्यावर साकारल्यात. कोल्हापुरात शालिनी सिनेटोन स्टुडिओत या चित्रपटाचे चित्रीकरण झाले. या चित्रपटासाठी लावणीगीते गाण्याच्या संधीचा उषा मंगेशकर यांना विशेष आनंद झाला. अण्णांनी अर्थात व्ही शांताराम यांनी आपल्याला गायला बोलावणं हीच आपल्यासाठी मोठी गोष्ट होती. आपल्या कारकीर्दीत 'पिंजरा' सिनेमातील गीतांचं स्थान फार मोलाचं आहे असं उषा मंगेशकर यांचं प्रामाणिक मत आहे.

'पिंजरा'तील 'लागली कुणाची उचकी' हे गीत गाण्यासाठी अधिक आव्हानात्मक आहे, ते गाताना आपला कस लागला, असं उषा मंगेशकर यांचं म्हणणं आहे.

जुन्या काळात विशेषतः पन्नास साठ सत्तरच्या दशकात मराठी चित्रपटांचे 'बजेट' खूप कमी असल्यामुळे निर्माते संगीतावर हात राखून खर्च करीत. त्यामुळे भालजींची निर्मिती असणाऱ्या चित्रपटाच्या ध्वनिमुद्रणासाठी लतादिदींनी फक्त चारपाच वादक कलावंतांचे साह्य घेतले, परंतु या कलाकारांमध्ये पं. हरिप्रसाद चौरासिया, पं. शिवकुमार शर्मा, अण्णा जोशी यांचा समावेश होता. दीदीने संगीत दिलेल्या गीताचे वांद्रे येथील मेहबूब स्टुडिओमध्ये ध्वनिमुद्रण व्हायचे. आश्चर्य म्हणजे अवघ्या दोन ते अडीच तासांत दिदी एक गाणे ध्वनिमुद्रित करीत असत. गायनक्षेत्रात दिदी सर्वोच्च स्थानी पोचल्यानंतरही त्यांच्यावर संगीत देताना कसलेही दडपण नसे. त्या काळात भालजींसारखे दिग्दर्शक दिदींना दूरध्वनीवरून केवळ कथानक सांगत आणि दिदी केवळ कथानक ऐकून इथेच गीताचे ध्वनिमुद्रण करीत असे. भालजींचा दिदींवर मोठा विश्वास असल्याने त्यांना ध्वनिमुद्रित गीतेच ऐकविली जात. प्रतिभावंत लेखक क्षणार्धात चांगली ओळ लिहून जातो. दिदींचेही तसेच होते. दिदींची प्रत्येक चाल हृदयातून येत असे. चाल सुचल्यावर ती रसिकांना आवडेल की नाही याचा विचार त्या करीत नसत.

'आनंदघन' नावाने लता मंगेशकरच संगीत देत असल्याची खात्री पटल्यावर मराठीबरोबरच हिंदी चित्रपटसृष्टीतील अनेक निर्मात्यांनी त्यांना त्यांच्या चित्रपटासाठी संगीत देण्याचा आग्रह केला, परंतु दिदींनी केवळ भालजींच्या आग्रहाखातर संगीत दिले असल्याने त्यांचा इतरांना नकार ठरलेलाच होता. सख्खी बहीण उषा मंगेशकरलाही दिदींनी नकार दिला. 'पवनाकाठचा धोंडी' या आपण निर्मिलेल्या चित्रपटासाठी दिदीने संगीत द्यावे, अशी उषा मंगेशकर यांची अपेक्षा होती, मात्र दिदी त्यांची अपेक्षा पूर्ण करू शकल्या नाहीत. हृदयनाथ मंगेशकर यांनीही दिदींना संगीत देण्याचा आग्रह केला होता, परंतु दिदी आपल्या निर्णयावर ठाम राहिल्या.

साठच्या दशकात मोठ्याच प्रमाणावर शाहीरपट आणि तमाशाप्रधान मराठी चित्रपट पडद्यावर आल्याचे दिसते आणि त्यासह अनेक लावणी गीतेही आली. १९५८चा लोकशाहीर अनंत फंदी ते १९७२चा 'पिंजरा' या कालावधीतील असे चित्रपट सांगायचे तर, सांगत्ये ऐका, चाळ माझ्या पायात, शाहीर परशुराम, रंगल्या रात्री अशा, सुंदरा मनामध्ये भरली, सवाल माझा ऐका, मल्हारी मार्तंड, केला इशारा जाता जाता, एक गाव बारा भानगडी, ही नार रूपसुंदरी, सुरंगा म्हंत्यात मला, सांगू कशी मी, देवा तुझी देवाची जेजुरी, मानाचा मुजरा, मुरळी मल्हारी रायाची, रंगू बाजाराला जाते, गण गौळण, डोंगरची मैना, मला तुमची म्हणा, गणानं घुंगरु हरवलं, लाखात अशी देखणी, पिंजरा... त्या काळात वर्षभरात पंधरा सोळा मराठी चित्रपट निर्माण होत त्या तुलनेत ही संख्या उत्तमच म्हणायची.

रणजीत देसाई यांच्या, तबलजींच्या जीवनावरील कथेवर हरिभाऊ रहातेकरांनी सहकारी तत्त्वावर रंगल्या रात्री अशा या चित्रपटाची निर्मिती १९६२मध्ये केली. कोल्हापूरचे अरुण सरनाईक त्या चित्रपटाचा नायक होते. त्या चित्रपटात लावण्या, गझला व नाट्यगीते असे संगीताचे वेगवेगळे प्रकार होते. लावणीत संगीतकार वसंत पवार फॉर्मात होते. 'रंगल्या रात्री अशा'मध्ये त्यांनी गीतकार जगदीश खेबूडकर यांना प्रथम संधी देऊन त्यांच्याकडून लावण्या लिहून घेतल्या आणि त्या लावण्यांचे चित्रिकरण राधाबाई बुधगावकर यांच्या तमाशा बारीवर केले. खेबुडकरांनी लिहिलेल्या पहिल्याच लावणीचा मुखडा होता 'नाव गाव कशाला पुसता? अहो, मी आहे कोल्हापूरची मला हो म्हणतात लवंगी मिरची'. कोल्हापूरच्या गीतकार व नायकाप्रमाणेच लावणी गायिकाही कोल्हापूरची असावी असा विचार करून वसंतरावांनी ती लावणी सुलोचना चव्हाण यांच्याकडून गाऊन घ्यायची असे ठरवले. वसंतराव सुलोचनाबाईंना त्यांच्या घरी मुंबईला जाऊन भेटले. त्या भेटीचे वर्णन सुलोचनाबाईंच्या शब्दांत....

...मी घरात होते. अचानक दार वाजले, मी दार उघडले, बघते तर बाहेर गबाळ्या कपड्यातील, केस विस्कटलेले एक गृहस्थ उभे! मी म्हणाले, 'आपण कोण?' ते म्हणाले, 'मी वसंत पवार, सुलोचनाबाई तुम्हीच ना? तुमच्याकडून लावणी गाऊन घ्यायची आहे.' मी थक्कच झाले. साक्षात वसंत पवार, मराठीतील एवढे मोठे नामवंत संगीतकार, माझ्या दारात उभे! त्यांनी खिशातून कागद काढला. त्यांनी घडी घातल्यामुळे पार चुरगाळल्या गेलेल्या त्या कागदावरची लावणी वाचून दाखवली. दुपारच्या भोजनाची वेळ झालेली होती. मी त्यांना 'जेवणार का?' म्हणून विचारले. वसंतरावांच्या डोळ्यांत अश्रू तरळले. ते सद्‌गदित आवाजात म्हणाले, 'लोकांनी आजपर्यंत मला फक्त पिणार का? म्हणून विचारले. तुम्ही प्रेमाने दोन घास खाणार का? असे कुणीच विचारले नाही.

'रंगल्या रात्री अशा' चित्रपट मुंबईत गिरगावातील मजेस्टिकमध्ये लागला होता. तबलावादक अल्लारखाँ, नर्तिका मिनू मुमताज, गायक छोटा गंधर्व, पार्श्वगायिका आशा भोसले व सुलोचना चव्हाण यांनी त्यांच्या कलाकौशल्याने बोलपटात अक्षरश: नवरंग उधळले होते. पडद्यावर राधाबाई बुधकरांच्या संगीत बारीचे चित्रण बघताना प्रेक्षक अस्सल तमाशाचा अनुभव घेऊन धुंद होत. गायन-वादन, ताल-सूर, गळा-हात यांचा इतका सुरेख मिलाफ 'रंगल्या रात्री अशा'पूर्वी क्वचित झाला असेल..

कथा-पटकथा लेखक रणजीत देसाई, गीतकार जगदीश खेबुडकर, संगीतकार वसंत पवार व पार्श्वगायिका सुलोचना चव्हाण हा यशस्वी फॉर्म्युला अनंत माने यांच्या 'सवाल माझा ऐका' या चित्रपटातही होता. त्या चित्रपटाद्वारे माया जाधव यांनी सिनेसृष्टीत पदार्पण केले. त्यातील सुलोचना चव्हाण यांनी गायलेल्या, कसं काय पाटील बरं हाय कां?' व 'सोळावं वरीस धोक्याचं गं' या दोन लावण्यांनी कहर केला. महाराष्ट्रभर त्या लावण्या गाजल्या. या चित्रपटाचा रौप्य महोत्सव आचार्य अत्रे यांच्या अध्यक्षतेखाली टॉकिजमध्ये १० एप्रिल १९६५ रोजी थाटामाटात साजरा झाला.

पुण्याच्या राम कर्वे व राम देवताळे यांच्या 'मल्हारी मार्तंड' या चित्रपटाची कथा-पटकथा-संवाद व दिग्दर्शन दिनकर द. पाटील यांचे होते तर गाणी ग.दि. माडगुळकरांनी लिहिलेली होती. वसंतरावांनी दोन तासांत त्यातील सर्व गाण्यांना चाली लावल्या. ढोलकीची साथ बबन काळे यांनी केली होती. त्यातील सुलोचनाबाईनी गायलेल्या,

'पदरावरती जरतारीचा मोर नाचरा हवा, आई मला नव शालू नवा' आणि 'फड सांभाळ तुज्याला गं आला, तुझ्या ऊसाला लागंल कोल्हा' या दोन लावण्यांचे ध्वनिमुद्रण राजकमल स्टुडिओत चालू होते. लावण्या इतक्या सुरेख रंगल्या होत्या, की त्या ऐकायला ध्वनिमुद्रक मंगेश देसाई स्वत: जाऊन शांतारामबापूंना घेऊन आले. त्या चित्रपटाच्या गाण्यांच्या पार्श्वगायनासाठी १९६५ साली सुलोचना चव्हाण माईंना महाराष्ट्र राज्य पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

मराठी चित्रपटातील लावणी गीत संगीत व नृत्य यांच्या यशस्वी परंपरेचा वेध घ्यायचा तर त्यात बरेच रंगढंग आहेत...अनेक आठवणी, किस्से, गोष्टी, कथा आहेत... लावणी गीतांनी अनेक गोष्टी घडवल्या.

अशीच ही एक. 'ही माझी लक्ष्मी' (१९५१) या चित्रपटाद्वारे सुलोचना कदम हिंदीतून मराठीत आल्या. त्याचे संगीतकार होते वसंत देसाई. सुलोचनामाई यांनी त्या चित्रपटासाठी गायलेली लई दिसांनी आला ही लावणी हंसा वाडकर यांच्यावर चित्रित झाली. माईनी १९५५च्या 'कलगीतुरा' या चित्रपटासाठी राजा बढे यांनी गाय लिहीलेल्या तुरेवाले किती पळाले वगैरे लावण्या गायल्या. त्या चित्रपटाचे दिग्दर्शक होते 'शामराव चव्हाण'. पुढे त्याच दिग्दर्शकाबरोबर माईंचे लग्न झाले आणि त्या सुलोचना कदम यांच्या सुलोचना चव्हाण झाल्या. शामराव चव्हाण यांनी सुलोचनाबाईंना शब्दोच्चारांचे तसेच कुठल्या शब्दावर जोर द्यायचे त्याचे शिक्षण दिले. माईंच्या लावणीला त्याचा मोठा फायदा झाला आणि सुलोचनामाई चव्हाण या लावणीसम्राज्ञी म्हणून ओळखल्या गेल्या.

साठच्या दशकात मोठ्याच प्रमाणावर शाहीरपट आणि तमाशाप्रधान मराठी चित्रपट पडद्यावर आल्याचे दिसते आणि त्यासह अनेक लावणी गीतेही आली. १९५८चा लोकशाहीर अनंत फंदी ते १९७२चा पिंजरा या कालावधीतील असे चित्रपट सांगायचे तर, सांगत्ये ऐका, चाळ माझ्या पायात, शाहीर परशुराम, रंगल्या रात्री अशा, सुंदरा मनामध्ये भरली, सवाल माझा ऐका, मल्हारी मार्तंड, केला इशारा जाता जाता, एक गाव बारा भानगडी, ही नार रूपसुंदरी, सुरंगा म्हंत्यात मला, सांगू कशी मी, देवा तुझी देवाची जेजुरी, मानाचा मुजरा, मुरळी मल्हारी रायाची, रंगू बाजाराला जाते, गण गौळण, डोंगरची मैना, मला तुमची म्हणा, गणानं घुंगरु हरवलं, लाखात अशी देखणी, पिंजरा....त्या काळात वर्षभरात पंधरा सोळा मराठी चित्रपट निर्माण होत त्या तुलनेत ही संख्या उत्तमच म्हणायची.

रणजीत देसाई यांच्या, तबलजींच्या जीवनावरील कथेवर हरिभाऊ रहातेकरांनी सहकारी तत्त्वावर 'रंगल्या रात्री अशा' या चित्रपटाची निर्मिती १९६२मध्ये केली. कोल्हापूरचे अरुण सरनाईक त्या चित्रपटाचा नायक होते. त्या चित्रपटात लावण्या, गझला व नाट्यगीते असे संगीताचे वेगवेगळे प्रकार होते.

लावणीप्रधान चित्रपटांची ही परंपरा आता चंद्रमुखी (अमृता खानविलकरची फक्कडबाज लावणी नृत्य), फुलवंती (प्राजक्ता माळीची तजेलदार नृत्य) अशी आजही यशस्वीपणे सुरू आहे.


लावणी गीत संगीत व नृत्य ही मराठी चित्रपटाची एक विशेष खासियत आहे, ओळख आहे. नृत्य हा अभिनयातील एक अतिशय मेहनती आणि सर्व प्रकारच्या भावभावना असणारा लोकगीत लोकसंगीत यांची यशस्वी परंपरा असलेला प्रकार. अतिशय आदर ठेवावा असाच कला प्रकार.

ही परंपरा आता लक्ष्मण उतेकर दिग्दर्शित विठाबाई नारायणगावकर, या घोषणेपासूनच चर्चेत असलेल्या चरित्रपटापर्यंत आला आहे. हा चित्रपट हिंदीत असल्याने तो अधिकाधिक लोकांपर्यंत पोहचेल हे निश्चित. आपण श्रद्धा कपूरला शुभेच्छा देऊयात...

---

# प्रसिद्ध शास्त्रीय गायक सी.आर. व्यास

चिंतामण रघुनाथ व्यास यांची प्रसिद्ध हिंदुस्थान शास्त्रीय संगीत गायक व संगीतज्ज्ञ अशी ओळख राहिली आहे. त्यांचा जन्म ९ नोव्हेंबर १९२४ रोजी महाराष्ट्रातील उस्मानाबाद जिल्ह्यात झाला. त्यांचे घराणे संस्कृत विद्वान आणि कीर्तनकारांची परंपरा असलेले होते. त्यांचे सुरुवातीस संगीताचे शिक्षण किराणा घराण्याचे गायक पं. गोविंदराव भातंब्रेकर यांच्याकडे सुरू झाले. सुमारे बारा वर्षे ही तालीम चालली.



वयाच्या एकविसाव्या वर्षी ते मुंबईला आले.माटुंगा येथील अभियांत्रिकी महाविद्यालयात नोकरी करताना सी.आर. व्यास ग्वाल्हेर घराण्याचे पंडित राजारामबुवा पराडकर यांच्याकडे गायन शिकू लागले. गाण्यातील सौंदर्य, भावदर्शन संबंधी विचारमंथन करत असताना आग्रा घराण्याचे नामवंत गायक जगन्नाथबुवा पुरोहित (गुणीदास) यांच्या कलेमुळे प्रभावित होऊन त्यांच्याकडून त्यांनी तालीम सुरू केली, की जी त्यांच्या निधनापर्यंत चालू होती. या बरोबरीनेच व्यास यांना श्रीकृष्ण रातंजनकर, चिदानंद नगरकर, के.जी. गिंडे, एस.सी. आर. भट इत्यादींकडूनदेखील मार्गदर्शन मिळाले. सी. आर. व्यास यांच्या गायकीवर किराणा, ग्वाल्हेर आणि आग्रा या तीनही घराण्यांचे संस्कार होते, तथापि त्यांनी खुल्या आणि मोकळ्या आवाजाची भावपूर्ण अशी एक स्वतंत्र वेगळी गायकी निर्माण केली. त्यामुळे गायकीच्या प्रसन्नतेत भर पडली.

संगीत रिसर्च अकादमी, भारतीय विद्या भवन येथे त्यांच्या बंदिशींचे ध्वनिमुद्रण सुरक्षित आहे. 'गुणीजन' (गुनिजान) या टोपणनावाने त्यांनी अनेक बंदिशी रचल्या. धनकोनी कल्याण, सगेरा, सुध-जोगिया, शिव-अभोगी, सुधरंजीनी अशा रागांची निर्मितीही त्यांनी केली. अभिजात शास्त्रीय संगीताच्या साधकांना व्यासपीठ मिळावे व त्याचा प्रसार व्हावा या हेतूने त्यांनी त्यांच्या गुरुंच्या स्मरणार्थ 'गुणिदास संगीत संमेलन' याची सुरुवात केली. सी. आर. व्यास यांना त्यांच्या अनेकविध सांगीतिक कार्यकर्तृत्वाबद्दल अनेक मान-सन्मान लाभले. संगीत नाटक अकादमी पुरस्कार (१९८७), महाराष्ट्र गौरव पुरस्कार (१९९०), पद्मभूषण पुरस्कार (१९९२), उस्ताद हाफीज अली पुरस्कार (१९९४), महाराष्ट्र -मराठवाडा पुरस्कार (१९९८), मास्टर दीनानाथ मंगेशकर पुरस्कार (१९९९), आणि मध्य प्रदेश सरकारचा मानाचा तानसेन पुरस्कार (१९९९) आदी पुरस्कारांचा त्यात समावेश आहे. सी.आर. व्यास यांच्या बंदिशींचे पुस्तक राग सरिता या नावाने प्रसिद्ध झाले आहे (१९८४). यात त्यांनी रचलेल्या नवीन रागांच्या समावेशासह त्यांनी रचलेल्या १२१ बंदिशी आहेत.

या पुस्तकाची सुधारित आवृत्ती २०१९मध्ये प्रकाशित झाली. यात त्यांच्या ३२ नव्या बंदिशींचा समावेश आहे. त्यांच्या संगीताचा वारसा त्यांचे सुपुत्र सतीश (संतूर वादक) आणि सुहास (गायक) आणि शिष्य प्रभाकर कारेकर, कुंदा वेलिंग, संजीव चिम्मलगी, अलका जोगळेकर आदींनी पुढे चालवला आहे.सी.आर. व्यास यांचे १० जानेवारी २००२ रोजी कोलकाता येथे निधन झाले.


**-सु.र. देशपांडे**

---

# महर्षी धोंडो केशव कर्वे

महर्षी धोंडो केशव कर्वे यांचा जन्म १८ एप्रिल १८५८ रोजी रत्नागिरी जिल्ह्यातील खेड तालुक्यामध्ये शेरावली या गावी झाला. यांच्या वडिलांचे नाव केशव बापूराव कर्वे आणि आईचे नाव लक्ष्मीबाई केशव कर्वे होते. त्यांचे बालपण मुरूड या रत्नागिरी जिल्ह्यातील एका गावात गेले. आज त्यांचा स्मृतीदिन (९ नोव्हेंबर १९६२) आहे. जाणून घेऊया त्यांच्याविषयी या लेखातून..

महर्षींनी महिलांचे शिक्षण, त्यांचे हक्क, विधवा-पुनर्विवाह यांसाठी आपले १०४ वर्षांचे जीवन वाहिले. शिक्षणासाठी त्यांना फार परिश्रम घ्यावे लागले, दूरवर पायपीट करावी लागायची. ते मॅट्रिक झाल्यानंतर मुंबई येथील एल्फिन्स्टन कॉलेजात गणिताची पदवी घेण्याकरिता त्यांनी प्रवेश मिळविला. कर्वेंनी त्या वर्षी फर्ग्युसन कॉलेज येथे गणित हा विषय शिकविण्यास सुरुवात केली. १९१४पर्यंत त्यांचं हे कार्य सुरू होतं.



कर्वे १४ वर्षांचे असताना त्यांचा विवाह आठ वर्षांच्या राधाबाईंशी झाला. वयाच्या २७व्या वर्षी बाळंतपणात राधाबाईंचा मृत्यू झाला. राधाबाईंच्या मृत्यूनंतर कर्वेंना पुनर्विवाह करण्यासाठी आग्रह धरला गेला. त्या वेळी त्यांचे वय ४५ होते. त्या काळी प्रौढ विधुरांचा विवाह लहान वयाच्या कुमारीकेशी लावून देण्याची प्रथा होती, परंतु जर मुलीच्या पतीचे लवकर निधन झाले तर तिला मात्र तिचं आयुष्य विधवा म्हणून व्यतीत करावे लागेल. महर्षी कर्वेंना ही बाब अजिबात मान्य नव्हती, म्हणून त्यांनी पंडिता रमाबाईंच्या शारदा सदन येथे वास्तव्यास असलेल्या गोदुबाई या विधवेशी पुनर्विवाह केला. समाजाला ही गोष्ट अजिबात रूचली नाही. त्यांचा सामाजिक बहिष्कार करण्यात आला. या गोष्टींचादेखील त्यांनी खूप धिटाईने सामना केला. गोदुबाई पुढे आनंदी कर्वे व बाया कर्वे या नावाने प्रसिद्ध झाल्या. त्यांनी महर्षी कर्वे यांना खूप साथ दिली. त्या खंबीरपणे त्यांच्या बरोबरीने उभ्या राहिल्या. महर्षी कर्वेंची चार मुलं रघुनाथ, शंकर, दिनकर आणि भास्कर यांनी देखील अनेक क्षेत्रांमध्ये मोलाचे कार्य केले आहे.

कर्वेंनी पुनर्विवाह विधवा विवाह प्रतिबंध निवारक मंडळाची स्थापनादेखील केली. बालविवाहासारख्या कुप्रथा बंद व्हाव्यात म्हणून त्यांनी अनाथ बालिकाश्रमाची स्थापना केली. विधवांकरिता वसतीगृहाची त्यांनी निर्मीती केली. त्यांनी विधवा महिलांसाठी महिला विद्यालयाची स्थापना केली. या विद्यालयात महर्षी कर्वेंची २० वर्ष वयाची विधवा मेहुणी पार्वतीबाई आठवले ही पहिली विद्यार्थिनी म्हणून होती. महर्षी यांनी आश्रमाच्या शाळेच्या कार्यासाठी मनुष्यबळ पाहिजे होते, त्यासाठी त्यांनी निष्काम कर्ममठांची स्थापना केली. पुढे त्याचे नाव हिंगणे स्त्री शिक्षण संस्था नंतर महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्था असे करण्यात आले.

जपानचे महिला विद्यापीठ बघून त्यांनी प्रभावित होऊन पुणे येथे महिला विद्यापीठाची स्थापना केली. विठ्ठलदास ठाकरसी यांच्याकडून त्यांना १५ लक्ष रुपयांचे अनुदान मिळाल्यामुळे त्या विद्यापीठाचे नाव श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ देण्यात आले.

विधवा महिलांचे प्रश्न त्यांचे शिक्षण याकरिता कर्वेंनी भरीव कार्य केलं. अस्पृश्यता, जातीभेद, जातीव्यवस्था या विरोधातदेखील त्यांनी आवाज उचचला. स्त्रीला सन्मानाची वागणूक मिळावी यासाठी आणि स्त्रियांना शिक्षण मिळावे यासाठी खूपच मोलाचं कार्य केले आहे. त्यांचे निधन वृद्धापकाळाने ९ नोव्हेंबर १९६२ साली पुण्यात झाले.

अनेक भारतीय विद्यापीठांनी कर्वेंना डी.लिट. पदवी देऊन सन्मानित केले. पद्मविभूषण' हा किताब त्यांना प्रदान करण्यात आला, तर लगेच त्यांना भारतातील सर्वोच्च नागरी सन्मान 'भारतरत्न'ने सन्मानित करण्यात आले. एकशेचार वर्षांचे दीर्घायुष्य देऊन निसर्गानेही त्यांना सन्मानित केले. त्यांच्या या कारकिर्दीला मानाचा मुजरा. (साभार : इंटरनेट)

# पेण पालिका मैदानावर वंदे मातरम् गीताचा गजर




**पेण : प्रतिनिधी**

पेण तहसीलदार कार्यालय आणि आयटीआय शिक्षण संस्था आयोजित वंदे मातरम गीताला १५० वर्ष झाली या दीड शतकातील भारतीय नागरिकांना प्रेरणादायी ठरलेल्या राष्ट्रगीताचा सन्मान आज पेण नगरपालिका मैदानावर ओसंडून वाहत होता.

या कार्यक्रमासाठी खासदार धैर्यशिल पाटील, प्रांताधिकारी प्रविणपवार, तहसिलदार तानाजी शेजाळ, नायब तहसिलदार प्रसाद कालेकर, माजी नगराध्यक्षा प्रितम पाटील, आदिवासी विभागाच्या तेजस्विनी गलांडे, पेण पोलीस निरीक्षक संदीप बागुल, राजू पिचिका, महेश बी-हाडे, लक्ष्मी शालिनी विद्यालय प्राध्यापक, ओद्योगिक कॉलेजचे प्राचार्य सदाशिव पाटील, मा. गटनेतेअनिरुद्ध पाटील, वैशाली कडू, नंदा म्हात्रे, जि.प. सदस्य प्रभाकर म्हात्रे, डी. बी. पाटील, शोमेर पेणकर यांच्यासह पेण शहरातील तालुक्यातील विविध शाळांतील विद्यार्थी विद्यार्थ्यांनी शिक्षक वर्ग उपस्थित होते.

यावेळी प्राध्यापक महेश बिन्हाडे, यांनी बूंदे मातरम या राष्ट्रीय गीताबद्दल स्वातंत्र्यपूर्व काळात कधी रचना निर्मिती, बद्दल विचार व्यक्त केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुभाष टेंबे, यांनी तर तबलावादन बल्लाळ ढवळे, आठवले यांनी केले.

शेकडो विद्यार्थ्यांसमवेत नागरीक, राजकीय क्षेत्रातील नेते मंडळी शासकीय अधिकारी प्राचार्य शिक्षक शासकीय कर्मचारी महिलांच्या उपस्थित वंदे मातरम् राष्ट्रगीत मोठ्या अभिमानाने गायले. यानंतर आयटीआयच्या विद्यार्थ्यांनी वंदे मातरम् ही नाटीका सादर करीत या गितातील प्रत्येक काव्यपंक्ती उलगडा सादरीकरण करीत अखंड भारत राष्ट्रीय एकात्मता राखण्यासाठी उपस्थितांना आवाहन केले.

आयटीआयचे प्राचार्य श्री सदाशिव जनार्दन पाटील, मुख्य समन्वयक-श्रीमती प्रीती शिरसाठ संदानशिव, वरिष्ठ निदेशक प्रवीण संदानशिव निदेशक प्रफुल्ल फड विजय साळवी, प्राजक्ता मोते, वनश्री मेश्राम, नंदकुमार लोंढे, विजय पाटील, श्रीमती आरती घरत, श्रीमती श्रुती साळुंखे श्री नवनाथ कोळी व समस्त शासकीय तांत्रिक विद्यालय कर्मचारी पेण.

तसेच पेण प्रायव्हेटचे प्राचार्य आर.एम. म्हात्रे सार्वजनिक विद्यामंदिरचे प्राचार्य नाईक सर यांनी या कार्यक्रमासाठी विशेष योगदान दिले

# रोहा बेलवाडीतील हातभट्टी अड्डा उद्ध्वस्त

## १६ हजार लिटर रसायन नष्ट, चार आरोपींविरोधात गुन्हा दाखल

**धाटाव : प्रतिनिधी**

दारूबंदी मोहिमेअंतर्गत रोहा पोलिसांनी आणखी एक यशस्वी कारवाई करत बेलवाडी परिसरातील जंगल भागात उभारलेला गावठी हातभट्टी दारूचा अड्डा उद्ध्वस्त केला आहे. या कारवाईत पोलिसांनी तब्बल १६,००० लिटर रसायन आणि २० लिटर तयार दारू असा सुमारे १ लाख १४ हजार रुपयांचा मुद्देमाल नष्ट केला.



रोहा पोलीस ठाण्याच्या पथकाला खात्रीशीर माहिती मिळाल्यानंतर पोलिस स्टाफ व दोन पंचांच्या उपस्थितीत बेलवाडी गावाजवळील जंगल भागात छापा टाकण्यात आला. पाण्याच्या ओहळाजवळ ताडपत्रीखाली दारू तयार करण्यासाठी लागणारे रसायन, लाकडे, भांडी आणि प्लास्टिक पिंप आढळून आले. घटनास्थळी चार इसम सापडले असून त्यांनी आपली नावे मंगेश बाळाराम गोरे, दिनेश कोंडू शिंदे, जयंता राघो गोरे आणि वसंत बाळू हिरवे रा. बेलवाडी, ता. रोहा अशी सांगितली.

या चौघांनीच सदर भट्टी त्यांची असल्याचे कबूल केले असून त्यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेला मुद्देमाल पंचांच्या उपस्थितीत जागेवरच फोडून नष्ट करण्यात आला. ही कारवाई पोलीस निरीक्षक मारुती पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

# पेण नगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी प्रशासन सज्ज

**पेण : प्रतिनिधी**

पेण नगरपरिषद निवडणुकीसाठी प्रशासन सज्ज झाले असून आगामी निवडणुकीची लगबग आता सुरू झाली असून आदर्श आचारसंहितेची अंमलबजावणी प्रशासनाने कडक पद्धतीने सुरू करण्यात आली असल्याची माहिती पत्रकार परिषदेत निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसिलदार तानाजी शेजाळ यांनी दिली. यावेळी त्यांच्यासोबत सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तुषार कामत, नवनिर्वाचित मुख्याधिकारी अभिषेक पराडकर उपस्थित होते.



पेण न.प.प सभागृहात झालेल्या पत्रकार परिषदेत माहिती देताना तानाजी शेजाळ यांनी संगितले कि, पेण न. प. निवणुकीसाठी १२ प्रभाग असणार आहेत. यामध्ये २४ नगरसेवक व एक नगराध्यक्ष पदासाठी निवडणूक होणार असून ३३८७५ मतदार आहेत. यामध्ये पुरुष मतदार १६६०४ व स्त्री मतदार १७२७१ आहेत.

या वेळी पुढे बोलताना तहसिलदार तानाजी शेजाळ यांनी सांगितले कि, पेण निवडणूक कार्यक्रम जाहीर होताच पालिका प्रशासनाने शहरातील राजकीय बॅनर्स, पोस्टर्स हटवण्याची मोहीम राबवली. या मोहिमेत ४८ बॅनर्स व १४ भित्तीपत्रके हटवण्यात आली असून राजकीय उल्लेख असलेल्या २६ कोनशिला झाकण्यात आल्या आहेत. दुबार मतदारांच्या पडताळणीसाठी विशेष उपक्रम सुरू करण्यात आला असून दुबार नावे असलेल्या मतदारांची यादी पालिकेच्या फलकावर लावण्यात येणार आहे. संबंधित मतदारांनी आपले नेमके मतदान केंद्र स्पष्ट करण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे.

उमेदवारांनी आपले फार्म ऑनलाईन पद्धतीने भरावयाचे असून ज्या कोणाला अडचण येत असेल त्यासाठी मार्गदर्शन केंद्र उभारण्यात आले आहे. तसेच कोणचे काही सूचना, तक्रार असेल त्यासाठी हि मदत कक्ष उभारण्यात आले असल्याचे त्यांनी सांगितले.

आचारसंहिता काळात विनापरवानगी नवीन बॅनर वा पोस्टर लावल्यास आयोगाच्या नियमांनुसार संबंधित पक्ष किंवा इच्छुक उमेदवारांवर तात्काळ कारवाई केली जाईल, असा इशारा निवडणूक विभागाने दिला आहे.

पेणमधील निवडणूक वातावरण दिवसेंदिवस तापत असून, प्रशासनही आदर्श आचारसंहिता तंतोतंत पाळली जावी यासाठी सज्ज झाले आहे.

# मुरुड नगर परिषदेच्या निवडणुकीत आचारसंहितेचे पालन करण्याचे आवाहन

**मुरुड : प्रतिनिधी**

आगामी मुरुड नगरपरिषद निवडणूक निर्भय , मुक्त व पारदर्शक वातावरणात पार पडावी तसेच कुठेही आचारसंहितेचा भंग नागरिकांकडून होऊ नये सामाजिक सौहार्द कायम राखले जावे या उद्देशाने नुकतीच मुरुड पोलीस वरिष्ठ पोलीस निरीक्षक परशुराम कांबळे यांनी ठाणे अंतर्गत मुरुड शहर हद्दीतील प्रतिष्ठित नागरिक, शांतता कमिटी सदस्य, मोहल्ला कमिटी सदस्य, महिला दक्षता समिती सदस्य, ज्येष्ठ नागरिक तसेच सर्व पक्षाचे पदाधिकाऱ्यां ची शांतता समिती बैठक दर्या सारंग हॉल मुरुड येथे तहसीलदार आदेश डफळ यांचे अध्यक्षतेखाली मुख्याधिकारी सचिन बच्छाव मुरुड नगरपरिषद , कर निरीक्षक अनिकेत जगदाळे यांच्या प्रमुख उपस्थितीत झाली .



या बैठकीस माजी नगरसेवक प्रमोद भायदे , संजय गुंजाळ , संदीप पाटील, माजी नगराध्यक्ष स्नेहा पाटील , मंगेश दांडेकर , जनार्धन कंधारे , कुणाल सतवीडकर, आशिल ठाकूर , जाहीद फकजी , बाबु सुर्वे , नेहा पाके , तृप्ती पाटील , ड मृणाल खोत , वासंती उमरोटकर, नगमाना खानजादे , हसमुख जैन आदी मान्यवर उपस्थित होते .

प्रास्ताविक करतांना पोलिस निरीक्षक परशुराम कांबळे यांनी मतदान पूर्व व मतदानानंतर देखिल आचार संहितेचे पालन काटेकोरपणे केले पाहिजे . प्रचार सभा , रॅली , कोपरा सभा आदींसाठी उमेदवारांनी पोलीस परवानगी घेतली पाहिजे . स्पीकर परवाना रात्री १० ते सकाळी ६ पर्यंत मिळणार नाही तसेच प्रचार साहित्यावर मुद्रकाचे नाव असलेच पाहिजे . जेवणावळी वा प्रभाव पाडणारी प्रलोभने देतांना आढळल्यास १०० टक्के गुन्हा दाखल केला जाईल . मतदान पूर्व व मतदान निकाल घोषित होईपर्यंत दारू बंदी राहील यांची सर्वांनी नोंद घ्यावी . मुरुड मध्ये मिश्र वस्ती असल्याने धार्मिक भावना दाखवणारे कृत्य कोणी करू नये. असे अवाहन केले

मुख्याधिकारी सचिन बच्छाव यांनी मुरुड मध्ये जातीय सलोखा , सौहार्द तसेच परस्पर संबंध चांगले असल्याने निवडणूका शांततेत पार पाडण्यासाठी सर्व नागरिक सहकार्य करतील अशी अपेक्षा व्यक्त केली .समारोप प्रसंगी तहसिलदार आदेश डफळ यांनी पारदर्शी , निर्भय व शांततेत मतदान करता यावे यासाठी निवडणूक आयोगाने दिलेल्या सर्व कायदेशीर बाबी विस्तृत पणे सांगून आचार संहितेचे पालन करावे .या बैठकीत उपस्थित केलेल्या प्रश्नांना तहसिलदार डफळ यांनी समर्पक उत्तरे देऊन शंका समाधान केले

# संकष्ट चतुर्थीला अष्टविनायक तीर्थक्षेत्र पालीत भाविक बल्लाळेश्वरचरणी लीन

**पाली : प्रतिनिधी**

संकष्टी चतुर्थीला शनिवारी (ता. ०८) अष्टविनायक तीर्थक्षेत्र पालीत भाविक श्री. बल्लाळेश्वराच्या चरणी लिन झाल्याचे पहावयास मिळाले. यावेळी रायगड कोकणासह राज्याच्या कानाकोपऱ्यातून भाविक दाखल झाले होते. शनिवार व रविवार सुट्टी असल्याने भाविकांची अलोट गर्दी झाली होती

श्री. बल्लाळेश्वर मंदिर व गाभाऱ्यात फुलांची सजावट करण्यात आली होती. श्री. बल्लाळेश्वरला देखील आभूषण व वस्त्र परिधान करण्यात आले होते. तसेच मंदिरा बाहेर रांगोळी देखील काढण्यात आली होती. श्री. बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी जिल्ह्यासह विविध भागातून भाविक दाखल झाले होते. यामुळे येथे चांगली आर्थिक उलाढाल झाली असून येथील स्थानिक व्यावसायिक सुखावले आहेत.

भाविकांमुळे येथील हॉटेल व्यावसायिक, लॉजिंग बोर्डिंग वाले, पापड, लोणचे मिरगुंड विक्रेते, पेढेवाले, छोटे मोठे दुकानदार व इतर व्यावसायिकांचा धंदा तेजीत होता. मंदिर परिसरातील दुकाने व हॉटेल ग्राहकांनी गजबजले होते. भाविकांच्या सोयीसाठी बल्लाळेश्वर देवस्थान ट्रस्टच्या वतीने चोख व्यवस्था करण्यात आली होती. विविध वस्तूंनी भरलेली दुकाने व गर्दी यामुळे मंदिर परिसर गजबजलेला दिसत होता. मंदिर परिसराला यात्रेचे स्वरूप आले होते. अनेक भाविक स्वतःची वाहने घेवून आले होते. तर काही लक्झरी किंवा खाजगी बसेसने आले. यामुळे पालीतील रस्त्यावर वाहतूक कोंडी झाली होती.

बल्लाळेश्वर देवस्थान ट्रस्टच्या वतीने भाविकांच्या सोयीसाठी शुद्ध थंड पाणी व इतर व्यवस्था करण्यात आली होती. नाममात्र दरात प्रसादालयामध्ये प्रसाद (भोजन) उपलब्ध होता. सुरक्षारक्षक तैनात आहेत. रांगेत उभे राहण्यासाठी रेलींग व शेड उभारण्यात आली आहे. वाहने पार्क करण्यासाठी देवस्थानची दोन भव्य मोफत पार्किंग देखील आहे. तसेच सुसज्ज स्वच्छता गृह देखिल आहेत. त्यामुळे दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची कुठल्याही प्रकारची गैरसोय होत नाही. देवस्थान ट्रस्ट तर्फे सर्वतोपरी योग्य व्यवस्था केली आहे.




# माणगावात १२ नोव्हेंबरला नेत्र तपासणी आणि मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर

**माणगाव : प्रतिनिधी**

शंकरा आय हॉस्पिटल नवीन पनवेल व विजयशेठ मेथा चॅरिटेबल ट्रस्ट माणगाव यांच्यातर्फे मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन बुधवार दि.१२ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी ९ ते दुपारी २ यावेळेत जुने एसटी स्टँड माणगाव जवळ महेंद्र पितांबर मेथा यांच्या हॉलमध्ये करण्यात आले आहे. सदर शिबिराचा लाभ जास्तीत जास्त गरीब गरजू लोकांनी घ्यावा असे आवाहन माणगाव तालुक्यातील सामाजिक कार्यकर्ते तथा प्रसिद्ध उद्योजक विजयशेठ मेथा यांनी केले आहे.


## पेण नगरपरिषद, पेण

**जिल्हा-रायगड**

कार्यालय:०२१४३-२५२०२३ अध्यक्ष कार्यालय: ०२१४३-२५२०६३

मुख्याधिकारी: ०२१४३-२५२८२४ फॅक्स: ०२१४३-२५२१८३

Email:copenmc@gmail.com

**जा.क्र.पेनप/का.१/सार्वत्रिक निवडणूक -२०२५-२६** **दिनांक- ०७/११/२०२५**

**पेण नगरपरिषद पेण सार्वत्रिक निवडणूक २०२५**

**१. केंद्र निहाय मतदार यादी प्रसिध्दी**

**२. अंतिम मतदार यादीतील त्रुटी सुधारणा पुरवणी यादी प्रसिध्दी**

**जाहिर सूचना**

१) या जाहीर सुचनेव्दारे सर्व नागरिकांना कळविण्यात येते कीं, पेण नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ च्या अनुषंगाने मा. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांचे आदेशानुसार प्रभाग क्र.१ ते १२ साठी तयार करण्यात आलेली केंद्र निहाय मतदार यादी दि.७/११/२०२५ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे. सदर याद्या कार्यालयात उपलब्ध आहेत.

२) या जाहीर सुचनेव्दारे सर्व नागरिकांना कळविण्यात येते कीं, पेण नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ ची अंतिम मतदार यादी दि.३१/१०/२०२५ रोजी प्रसिध्द करण्यात आली होती. सदर यादीतील त्रुटींच्या अनुषंगाने दि.७/११/२०२५ रोजी सुधारित पुरवणी यादी प्रसिध्द केली आहे. याची नोंद घ्यावी. सदर पुरवणी याद्या कार्यालयात उपलब्ध आहेत.

**ठिकाण :- पेण**
**दिनांक :- ०८/११/२०२५**

**सही /-**
**मुख्याधिकारी**
**पेण नगरपरिषद, पेण**



## CHANGE OF NAME

I the undersigned **SHAFIQA BAZA** (Old name) Residing At **Post- Mendadi, Tal - Mhasla Dist- Raigad-402105** Changed my Name by the Government Gazzette No. **M25291217 /2025** dated **06.11.2025.** So that I remitter issue may here after be called by new Name **Shafika Habibullah Baza**

Sign. by New Name
**Shafika Habibullah Baza**



## जाहिर नोटीस

सर्व लोकांस जाहिर नोटीशीने कळविण्यात येते की,

खालील प्रमाणे वर्णन केलेली मिळकत श्री. मन्सूर हातीमभाई ढिल्ला व श्री तैयबी अकबरअली दोहादवाल भागीदार में ऑल इंडिया मिनराल्स कॉरपोरेशन यांचे कडून आम्ही हस्तांतरीत करू इच्छित आहोत -

सदर मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे पनवेल, ता- पनवेल, जि. रायगड**

| मालक कब्जेदाराचे नाव | प्लॉट नं | क्षेत्र |
|---|---|---|
| मे. ऑल इंडिया मिनरल्स कॉरपोरेशन | प्लॉट नं ४. पनवेल इंडस्ट्रियल को.ऑप इस्टेट.लि. | ९६६.५४ स्के. मी |

यापुढे सक्षिप्ततेसाठी सदर मिळकत म्हणून संबोधण्यात येईल

वर नमूद केलेल्या मिळकती मध्ये कोणाही व्यक्तीचा, कोणत्या ही संस्थेचा गहाण, कर्ज, बक्षीस, दान, साठे करार, कूळहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा, हक्क, भाडे पट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, अखत्यारपत्र बोजा, अथवा अन्य कोणताही प्रकारचा हक्क दिन संबंध, दिवाणी दाबा, महसूल वाद असल्यास लेखी हरकती त्याच्या हरकातीतील नमूद केलेल्या हक्का बाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुराव्यासह खाली सही करणार यांच्याकडे नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत प्रत्यक्ष बेऊन अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात.

या प्रमाणे हरकत मुदतीत न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजा रहित आहे असे समजून आम्ही आमचा हस्तातरणाचा ठरलेला व्यवहार पूर्ण करू व वरील मुदतीनंतर आलेली हरकत आमचेवर बंधनकारक राहणार नाही हे कळावे.

**ठिकाण : पनवेल**
**दिनांक : ०८/११/२०२५**

**सही/-**
**संचालक**
**कनक टू व्हीलरस प्रा.लि करिता**

**शोरूम** :- गाळा नं ३/४ रॉयल रेसीडेन्सी विश्राळी नाका सिंधी पंचायत हॉलच्या समोर पनवेल ४१०२०६ मो.नं. ८१०४११४५०३

# मानक प्रणालीचे नियमन न केल्यास नवी मुंबई पालिकेचा विकसकांना दंड

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रामध्ये काही बांधकामाच्या ठिकाणी सुरू असलेल्या कामांमध्ये होणाऱ्या ध्वनी व वायू प्रदूषणाबाबतच्या मानक प्रणालीची पूर्तता होत नसल्याबाबत नागरिकांच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. त्या अनुषंगाने दि. १२ ऑक्टोबर २०२५ रोजी या सुरू असलेल्या बांधकामाच्या ठिकाणी नवी मुंबई महानगरपालिकेमार्फत प्रत्यक्ष जागेची पहाणी करुन सदर मानक प्रणालीचे उल्लघंन होत असलेल्या एकूण ५९ विकसकांना दि. २४ ऑक्टोबर २०२५ रोजी सदर मानक प्रणालीची पूर्तता करण्याबाबत नोटीस बजाविण्यात आलेल्या आहेत.

महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये विविध ठिकाणी सुरू असलेल्या कामांमध्ये होणाऱ्या ध्वनी व वायू प्रदुषणाच्या अनुषंगाने उच्च न्यायालय, मुंबई यांनी स्वत:हून दाखल



करुन घेतलेल्या नियमन प्रणालीमध्ये दि.११ डिसेंबर २०२३ रोजी पारित केलेल्या आदेशानुसार वायू व ध्वनी प्रदूषण कमी करण्याबाबत आदेशित केलेले आहे. त्यानुसार उच्च न्यायालयाकडील आदेश तसेच वायू व ध्वनी प्रदूषण आणि ब्लास्टींगच्या अनुषंगाने नागरिकांकडून नवी मुंबई महानगरपालिकेस प्राप्त होत असलेल्या तक्रारी विचारात घेता त्यावर कायम स्वरुपी तोडगा काढण्यासाठी उपाययोजना करण्याच्या अनुषंगाने महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली व मान्यतेने मानक कार्यप्रणाली तयार करुन दि. १ ऑगस्ट २०२४ रोजी प्रसिध्द करण्यात आली होती. त्या मानक कार्यप्रणालीची मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण क्षेत्रात अंतर्भूत नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये प्रभावी अंमलबजावणी करण्यात आली आहे.

या अनुषंगाने नमुंमपा आयुक्त यांनी सहाय्यक आयुक्त यांना उपरोक्त मानक कार्यप्रणालीची कठोरपणे अंमलबजावणी करण्याकरिता दिलेल्या निर्देशानुसार विभाग स्तरावर विभागप्रमुख, उपअभियंता, सहा.अभियंता/कनिष्ठ अभियंता (स्थापत्य), स्वच्छता अधिकारी, स्वच्छता निरीक्षक/सहाय्यक स्वच्छता निरीक्षक, उद्यान अधिक्षक/उद्यान सहायक अशा अधिकारी/कर्मचारी यांची दक्षता पथकामध्ये नेमणूक करण्यात आलेली आहे.

याबाबत महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी दिलेल्या निर्देशानुसार नगररचना विभागामार्फत सहायक संचालक नगररचना सोमनाथ केकाण यांच्या अध्यक्षतेखाली नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रामध्ये सुरू असलेल्या बांधकामाच्या ठिकाणी होणाऱ्या वायू व ध्वनी प्रदूषणाच्या अनुषंगाने सर्व विभागांचे सहाय्यक आयुक्त तथा विभाग अधिकारी तसेच विकासक व वास्तुविशारद यांची बैठक आयोजित करण्यात आली होती. बैठकीमध्ये बांधकामाच्या ठिकाणी संरक्षक कुंपण व इतर बाबींची पूर्तता करणेबाबत माहिती देण्यात आली




## प्रशांत दामलेंना जीवन गौरव पुरस्कार

**नवी मुंबई : बातमीदार**

महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघ मुंबई प्रादेशिक विभागाचे आठवे द्वैवार्षिक अधिवेशन ७ नोव्हेंबर २५ विष्णुदास भावे नाट्यगृह , वाशी येथे कार्यक्रमाचे उद्‍घाटक वनमंत्री गणेश नाईक, अध्यक्ष अण्णासाहेब टेकाळे, पदसिध्द आजीवन अध्यक्ष दिगंबर चापके, माजी अध्यक्ष अरुण रोडे, मुंबई विभागाध्यक्ष सुरेश पोटे यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी मान्यवरांच्या उपस्थितीत अभिनेते प्रशांत दामले यांना जीवन गौरव पुरस्कार प्रदान करून सन्मानित करण्यात आले.

नवी मुंबई ज्येष्ठ नागरिकांना राहण्यासाठी परिपूर्ण शहर आहे. नवी मुंबईत ज्येष्ठांसाठी अनेक विरंगुळा केंद्र आणि नवी मुंबई महानगरपालिकेत ज्येष्ठांसाठी एक कक्ष आहे, असे कार्यक्रमाचे अध्यक्ष अण्णासाहेब टेकाळे यांनी सांगितले. ज्येष्ठांच्या बाबतीत हिंसाचाराच्या अनेक घटना घडत आहे. मुलांनी ज्येष्ठ व्यक्तींना त्रास देऊ नये .त्यांच्या सांभाळ करणे. आजची मुले उद्याचे ज्येष्ठ नागरिक आहेत. ज्येष्ठांच्या हिंसाचाराच्या विषयावरती उत्तम नाटक प्रशांत दामले यांनी घेऊन यावे. त्यांना जे काही सहकार्य पाहिजे ते आम्ही देणार, असे वनमंत्री गणेश नाईक म्हणाले.

ज्येष्ठ व्यक्तीने उर्वरित जीवनात शांत राहावे, ध्यान करावे, छंद जोपासावेत, आनंदी रहावे, असे मत अभिनेते प्रशांत दामले यांनी त्यांच्या मनोगतात व्यक्त केले.

## गव्हाण विद्यालयात वंदे मातरम्‌चे समूह गायन



**गव्हाण : रामप्रहर वृत्त**

भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा महामंत्र ठरलेल्या ' वंदे मातरम् ' ह्या गीताचा शतकोत्तर सुवर्ण महोत्सव अर्थात १५० वर्षे झाल्याबद्दल रयत शिक्षण संस्थेच्या येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये विद्यार्थी व शिक्षकांनी वंदे मातरम या राष्ट्रीय गीताचे हे समूह गायन केले.

शुक्रवार दिनांक ७ नव्हेंबर २०२५ रोजी विद्यालयाच्या प्रांगणात संपन्न झालेल्या या सामूहिक वंदे मातरम समूह गायन कार्यक्रमास विद्यालयाचे उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे, पर्यवेक्षिका शशिकला पाटील,संस्थेचे लाईफ वर्कर देवेंद्र म्हात्रे,ज्येष्ठ शिक्षक सागर रंधवे,क्रीडा शिक्षक सुरेश पारखे,अन्य शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

यावेळी विद्यालयाच्या सांस्कृतिक विभाग प्रमुख एच.आर.पाटील यांनी विख्यात तत्त्वज्ञ, राष्ट्रवादी लेखक आणि कवी बंकिमचंद्र चटोपाध्याय लिखित वंदे मातरम या गीताची महती सांगताना भारतीय स्वातंत्र्यलढ्याचा महामंत्र म्हणून प्रत्येक भारतीयाच्या हृदयात जाज्वल्य देशभक्ती आणि राष्ट्रप्रेम जागृत केले

## बालकांच्या हृदयविषयक आरोग्यावर चर्चासत्र

**नवी मुंबई : बातमीदार**

'आपल्या मुलांचे हृदय किती निरोगी आहे?' या विषयावर माहितीपूर्ण अशा वेबिनारचे आयोजन करण्यात आले होते. या चर्चासत्रात डॉ. सारंग गायकवाड (बालरोगतज्ज्ञ आणि जीयूसीएच सर्जन) यांनी बालकांमधील हृदयविकाराविषयी सखोल माहिती दिली.

यावेळी बालकांमधील हृदयरोगाचे वेळेवर निदान होण्याचे महत्त्व तसेच प्रत्येक पालकाला किंवा मुलांना सांभाळणाऱ्या व्यक्तीला माहित हवीत. प्रत्येक शिक्षकाने सीपीआरचे तंत्र आत्मसात करणे गरजेचे आहे, कारण आपत्कालीन परिस्थितीत हे ज्ञान एखाद्याचे प्राण वाचवू शकते, असे डॉ. गायकवाड यांनी सांगितले. कुटुंबकल्याण मंत्रालयातर्फे 'सीपीआर जनजागृती दिवस साजरा केला जातो. त्यानुसार टार्गेट लर्निंग व्हेंचर्सद्वारे हे चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते.

## वंदे मातरम् गीतास १५० वर्षे पूर्ण

### द्रोणागिरी आयटीआयमध्ये देशभक्तीचा उत्सव



**उरण : वार्ताहर**

द्रोणागिरी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, उरण (जि. रायगड) येथे वंदे मातरम् गीतास १५० वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने सार्थ शताब्दी सोहळा देशभक्तीपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रायगड जिल्हा व्यावसायिक शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी आणि संस्थेचे प्राचार्य मा. वे. पिल्ले साहेब होते. प्रमुख व्याख्याते म्हणून प्रा. डॉ. पराग कारुळकर सर यांनी वंदे मातरम् गीताचे ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि राष्ट्रप्रेरणादायी महत्त्व स्पष्ट केले. स्वातंत्र्यपूर्व काळात या गीताने क्रांतिकारकांना प्रेरणा दिली असल्याचे त्यांनी सांगितले.

अध्यक्षीय भाषणात श्री. मा. वे. पिल्ले साहेब यांनी प्रशिक्षणार्थ्यांना शिस्त, राष्ट्रनिष्ठा आणि स्वदेशी मूल्ये अंगीकारण्याचे आवाहन केले. प्रमुख उपस्थिती म्हणून आय.एम.सी. समितीचे सदस्य श्री. भिंडे साहेब यांनी विद्यार्थ्यांना स्वदेशीचा अवलंब करून देशहितासाठी कार्य करण्याचा संदेश दिला.

महाराष्ट्र शासनाच्या सूचनांनुसार वंदे मातरम् गीताचे समूहगायन अत्यंत भावनिक व देशभक्तीच्या वातावरणात पार पडले. वंदे मातरम्च्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला.

या प्रसंगी संस्थेतील सर्व प्रशिक्षक, कर्मचारी आणि प्रशिक्षणार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निदेशक श्री.ए.एस.पाटील यांनी केले, तर आभारप्रदर्शन श्री. एन डी.दशमुखे यांनी प्रशिक्षकांच्या वतीने केले. कार्यक्रमाची सांगता ही महाराष्ट्र गीता गायनाने करण्यात आली.



## सीवूड्समध्ये नटरंगचा कला स्पर्श महोत्सव २०२५

**नवी मुंबई : बातमीदार**

सीवूड्स येथिल नटरंग कला अकॅडमी आयोजित, 'कला स्पर्श महोत्सव २०२५' अगरिबकोली भवन. येथे उत्साहात पार पडला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून माजी खा. संजीव नाईक तसेच माजी नगरसेवक गणेश म्हात्रे उपस्थित होते.

संजीव नाईक यांनी कला स्पर्श महोत्सवाचे संचालक सचिन जोशी आणि नटरंग कला अकॅडमीच्या संचालिका मनाली जोशी यांच्या या उपक्रमाचे विशेष कौतुक केले. तसेच या मोहिमेसाठी कायमच पाठबळ राहील हा विश्वास दिला.

महोत्सवाचे सूत्रसंचालन अतिशय मार्मिक शब्दात जान्हवी खराळकर यांनी केले. यावेळी कला क्षेत्रातील भरतनाट्यम नृत्य शैलीच्या जागतिक ख्यातीच्या नृत्यांगना डॉ. स्वाती दैठणकर, अभिनेत्री नयन पवार तसेच प्रोग्रेसिव्ह ग्रुपचे चेअरमन विनोद त्रिवेदी उपस्थित होते. या महोत्सवात मुंबई आणि पुण्यातील विविध संस्थानी भाग घेतला. पुण्याच्या 'नृत्यस्वरा कलांगण स्कूल ऑफ डांस संस्थे'च्या कलाकारांनी शास्त्रीय नृत्य आणि भावदर्शक प्रस्तुती करून प्रेक्षकांची मनं जिंकली.तर मुंबईच्या 'सूर चैतन्य संस्थेच्या बाल कलाकारांनी गीत आणि संगीताची सुरेल मैफल रंगवली. विशेष आकर्षण म्हणजे अवघ्या १४ वर्षांच्या कुशल महाजन याने सायर व्हील ॲक्ट सादर करत वेस्टर्न डांस सादर केला

## भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे प्रेरणादायी स्मरण करीत विद्यार्थी दिन साजरा

**नवी मुंबई : बातमीदार**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शाळा प्रवेशाचे स्मरण करीत ७ नोव्हेंबर रोजी राज्यभरात विद्यार्थी दिन साजरा करण्यात येतो. या माध्यमातून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रेरक व्यक्तिमत्वापासून प्रेरणा घेऊन शिक्षणाचे महत्त्व विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबवत अत्यंत उत्साहाने विद्यार्थी दिवस साजरा केला जातो.

नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातही विद्यार्थी दिवस नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील महानगरपालिकेच्या व खाजगी सर्व माध्यमाच्या व सर्व व्यवस्थापनाच्या शाळांमधून साजरा करण्यात आला. याप्रसंगी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनातील काही प्रभावी प्रसंगांविषयी शिक्षकांनी विद्यार्थ्यांना माहिती करून दिली याप्रसंगी भारतरत्न बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवनावरील जीवनपटही प्रोजेक्टरच्या माध्यमातून शाळांमध्ये दाखविण्यात आला तसेच त्यांच्या कार्याची माहिती व महती सांगण्यात आली.



प्रत्येक विद्यार्थी हा देशाचे भविष्य आहे याकरिता विद्यार्थ्यांनी शालेय जीवनामध्ये सतत ज्ञान प्राप्त करीत रहावे व त्या ज्ञानाचा उपयोग स्वतःची व देशाची प्रगती करण्यासाठी करावा याबाबत शिक्षकांच्या माध्यमातून व तज्ज्ञ मार्गदर्शकांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे प्रबोधन करण्यात आले. काही शाळांमध्ये व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले होते तसेच पुस्तक प्रदर्शन मांडण्यात आले होते. काही शाळांमध्ये काव्यवाचन स्पर्धा तसेच वक्तृत्त्व स्पर्धा घेण्यात आल्या. शासन परिपत्रकानुसार नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील शाळांमध्ये विद्यार्थी दिन मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला.

त्याचप्रमाणे बकीमचंद्र चटोपाध्याय यांनी १८७५ साली लिहिलेल्या वंदे मातरम या गीताला १५० वर्ष पूर्ण झाली असून केंद्र व राज्य शासनाच्या निर्देशानुसार वंदे मातरम गीत सामूहिक रितीने गाण्याचा उपक्रमही नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील सर्व माध्यमाच्या व सर्व व्यवस्थापनाच्या शाळांमध्ये तसेच कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये राबविला गेला. यात अनेक ठिकाणई शिक्षक, विद्यार्थ्यांसह पालकही सहभागी झाले. काही ठिकाणी देशाभिमान प्रदर्शित करीत नागरिकांनीही यामध्ये मोठ्या संख्येने सहभाग घेतला.

## सीवूड्स येथील जेष्ठ नागरिक संगीताच्या कार्यक्रमात मंत्रमुग्ध

**नवी मुंबई : बातमीदार**

टी.एम.जी. क्रिएशन्सच्या वतीने सीवूड–दरावे जेष्ठ नागरिक विरंगुळा केंद्रात गुनगुना रहे हैं भंवरे हा गीत–संगीताचा कार्यक्रम नुकताच आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाची संकल्पना आणि निर्मिती एन. डी. खान यांची होती. सौ. सलमा खान आयोजक तर डॉ. विजय मोरे सहआयोजक म्हणून उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात केंद्राचे सचिव प्रकाश सोनावणे यांच्या प्रास्ताविकाने झाली. आपल्या मनोगतात एन. डी. खान यांनी, केंद्राच्या सहकार्याने वर्षभरात तीन संगीत कार्यक्रम साकारण्याची संधी मिळाल्याबद्दल आभार व्यक्त केले.

या प्रसंगी सुखदा ठाकूर, अशोक डिका, डॉ. विजय मोरे, सुनिता भुजबळ, विद्या डोंबे, विजय सुरवे, मिलिंद जाधव, निर्मला धोत्रे, सुरेश लऊळकर, मधुसूदन शेर्लेकर आणि दीपक कदम यांनी हिंदी व मराठी गीते सादर करून जेष्ठ नागरिकांना मंत्रमुग्ध केले. विद्या डोंबे यांनी कार्यक्रमाचे उत्कृष्ट सुत्रसंचालन केले, तर व्यवस्थापनाची जबाबदारी विजय सुरवे यांनी पार पाडली.

सामाजिक आणि साहित्य क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल काशिनाथ जाधव यांना टी.एम.जी. क्रिएशन्स आणि अमरदीप बालविकास फाउंडेशन तर्फे विशेष पुरस्कार प्रदान करण्यात आला. तसेच जेष्ठ समाजसेविका सौ. नंदा डेरे यांचाही सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमात सिनेअभिनेत्री उर्मिला डांगे, डॉ. मेघा धुमाळ, माधवी सूर्यवंशी, स्नेहा चांदोरकर, एच. एन. पाटील, सौ. पाकीजा अत्तार, सुनिल जोशी, सौ. लता सोनावणे, राजकुमार ताकमोगे, सौ. मीना ताकमोगे, अब्दुल गनी अत्तार, संतोष भालेराव आणि पूजा मन्डोरा यांचा देखील सत्कार करण्यात आला.

## संकष्ट चतुर्थीनिमित्त चिरनेर येथील महागणपतीच्या दर्शनासाठी भाविकांची गर्दी

**उरण : प्रतिनिधी**

उरण तालुक्यातील तिर्थक्षेत्र असलेल्या चिरनेर येथे काल ८ नोव्हेंबर रोजी संकष्टी चतुर्थी निमित्ताने , भाविकांनी श्री महागणपतीच्या दर्शनासाठी पहाटेपासूनच, रांगा लावल्या होत्या. काही भाविकांनी पायी वारी करीत मंदिर गाठून, श्रींचे दर्शन घेतले. यावेळी मंदिरात भजन संगिताचा सूर देखील ऐकायला मिळाला. उरण,पनवेल,रायगड, नवीमुंबईसह ठाणे आणि मुंबई येथील हजारोंच्या संख्येने भाविक दाखल झाले होते.

विशेषत: छोट्या–मोठ्या व्यवसायिकांचा व्यवसाय तेजीत होता. परिसरातील दुकाने ग्राहकांनी गजबजली



होती. शोभिवंत वस्तूंची दुकाने, हॉटेल,नारळ, हार, फुले व पापड, प्रसाद व पेढेवाले विक्रेते सुखावले होते. श्री महागणपती मंदिर परिसरात फळे, कंदमुळे व रानमेवा घेऊन अनेक आदिवासी व आगरी समाजाच्या महिला विक्रेत्या विक्री करताना दिसून आल्या. त्यामुळे श्री महागणपती मंदिर परिसरात मोठी वर्दळ दिसून आली.

विशेषत: मंदिरात येणारे भाविक येथून आवर्जून हा रानमेवा खरेदी करताना दिसत होते.भाविकांच्या सोयीसाठी श्री गणपती देवस्थान तर्फे चोख व्यवस्था करण्यात आली होती. श्री महागणपतीच्या कृपेमुळे भक्तांच्या मनोकामना पूर्ण होत असल्याचा अनुभव, श्रींच्या दर्शनासाठी येणाऱ्या गणेशभक्तांना येत असल्यामुळे गणेशभक्त दर संकष्टीला व माघी गणेश जयंतीला न चुकता येतात.असा येथील जाणकारांची अनुभूती आहे.

भाविकांच्या सोयीसाठी श्री गणपती देवस्थान तर्फे चोखव्यवस्था करण्यात आली होती.श्री महागणपतीच्या कृपेमुळे भक्तांच्या मनोकामना पूर्ण होत असल्याचा अनुभव, श्रींच्या दर्शनासाठी येणाऱ्या गणेशभक्तांना येत असल्यामुळे दर माघी संकष्टी चतुर्थीला चिरनेर येथे दर्शनाला येत असतात.

## रामदास शेवाळे यांना पुरस्कार

**पनवेल : वार्ताहर**

सामाजिक, शैक्षणिक आणि उद्योजकीय क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करून मराठा समाजाचे नाव उज्वल करणाऱ्या रायगड जिल्ह्यातील जनसेवक उद्योजक रामदास शेवाळे यांना यावर्षीचा 'मराठा भूषण' पुरस्कार प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार सकल मराठा समाज मंडळ, खांदा कॉलनी, पनवेल यांच्या वतीने संस्थेच्या पाचव्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित सोहळ्यात प्रदान करण्यात आला.



वर्धापन दिन सोहळा कार्यक्रम मराठा भवन, सेक्टर ९, खांदा कॉलनी येथे मोठ्या उत्साहात पार पडला.

कार्यक्रमादरम्यान मराठा समाजाची कन्या वैष्णवी गणेश कडू हिचा परदेशात कमर्शियल पायलट प्रशिक्षण पूर्ण केल्याबद्दल विशेष सत्कार करण्यात आला. या सोहळ्यास मराठा भूषण उद्योजक रामचंद्र ढोबळे, मराठा समाज रायगड जिल्हा समन्वयक विनोद साबळे, गणेश कडू, परिवर्तन सामाजिक संघटनेचे अध्यक्ष महादेव वाघमारे, नगरसेवक एकनाथ गायकवाड, गणेश पाटील, आगरी शिक्षण संस्थेचे मुख्याध्यापक प्रा. भगत सर, ज्येष्ठ पत्रकार संजय कदम, भीमराव पोवार, मराठा समाज – कामोठे, कळंबोली, खारघर, करंजाडे, आदई, पनवेल चे मराठा बांधव, सकल मराठा समाज मंडळ खांदा कॉलनी चे कार्यकारिणी मंडळ पदाधिकारी, सदस्य आदी मान्यवर उपस्थित होते.

# साजगावच्या यात्रेचा न्याराच साज!

**खालापूर : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील धाकटी पंढरी अशी ओळख असलेल्या विठ्ठल रखुमाई मंदिर यात्रेस कार्तिकी एकादशी म्हणजेच २ नोव्हेंबरपासून प्रारंभ झाला. सुरुवातीला या यात्रेवर पावसाचे सावट होते, मात्र सध्या पावसाने रजा घेतल्याने यात्रेकरूंच्या उत्साहाला उधाण आले आहे.



१५ दिवस चालणाऱ्या या यात्रेत रायगड, ठाणे, मुंबई, पुणे पश्चिम महाराष्ट्रातील लाखो भाविक दाखल होत असतात. या यात्रेत शेतीसाठी लागणारी अवजारे, सुकी मासळी, कपडे, भांडी, घोंगडी, मिठाईचा मोठा बाजार येथे भरतो. याशिवाय आकाशपाळणे, मौत-का-कुआ यांच्यासह विविध मनोरंजनाचे प्रकार येथे पहायला मिळतात. खोपोली नगरपालिका यात्रेचे नियोजन करते.

कार्तिकी एकादशीच्या आदल्या रात्री ताकई गावातून विठ्ठलाची पालखी निघून प्रत्येक घरी नेली जाते. गावातील तीन घराण्यांना सालाबादप्रमाणे पालखीचा मान दिला जातो. यात्रा कालावधीत मंदिरात काकड आरती, भजन, कीर्तन, हरिपाठ, अशा धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल असते. साजगाव यात्रेतील जिलेबीची चव घेण्यासाठी अनेक खवय्ये गर्दी करतात. स्वेटर, ब्लँकेट, घोंगड्या व चादरी यांचाही मोठा व्यापार या ठिकाणी होतो. कोळी बांधव १५ दिवसांत लाखो रुपयांची सुकी मासळी विक्री करतात. घाटमाथ्यासह विविध ठिकाणाहून खास सुकी मासळी खरेदीसाठी खवयांची तुंबडी उडते. यात्रेच्या काळात हा परिसर फुलून गेलेला असतो.

मनोरंजनाची अनेक साधने, बच्चेकंपनीसाठी खास पाळणे, फिरते लाकडी घोडे, जादूचे खेळ, करमणुकीचे कार्यक्रम यात्रेत असल्याने ही यात्रा परिसरातील नागरिकांसाठी पर्वणीच असते.

या यात्रेत शेतकऱ्यांचा साथी असणारी बैलजोडी विकत घेण्यासाठी पूर्वी शेतकरीवर्ग हमखास पोराबाळांसह यात्रेला हजर राहत असे, मात्र मागील काही वर्षात शेतीची जागा कारखान्यांनी घेतल्याने बैलबाजार ओस पडत आहे. तीच अवस्था घोंगडी बाजाराची झाली आहे.

यात्रेत ६२५च्या आसपास लहान मोठी विविध प्रकारची दुकाने थाटण्यात येतात. यातून नगरपालिकेला सुमारे पाच लाख रुपयांचा महसूल जमा होतो. पाणीपुरवठा, आरोग्य, वीज व स्वच्छता अशा सोयी यात्रेकरूंना पुरवल्या जातात.

१० एकर वनखात्याच्या माळरानावर १५ दिवसांसाठी यात्रेसाठी राखीव असा कायमस्वरूपी शेरा मारण्यात येतो. साजगाव यात्रेचे नाव असले तरी विठ्ठल मंदिर देवस्थान ताकई (खोपोली नगरपालिका हद्द) अशी यात्रा संपन्न होण्यासाठी खोपोली पोलीस एक चौकी उभारून कायदा सुव्यवस्था सांभाळत असतात.

परतीच्या पाऊस लांबला असल्याने सुरुवातीला या यात्रेवर पावसाचे सावट होते. अंतर्गत मार्गावर चिखल साठल्याने माल वाहतूक करणे जिकिरीचे झाले होते, पण हळूहळू पाऊस सरल्याने यात्रेत उत्साह पहावयास मिळत आहे.

# अलिबागेत विधी साक्षरता कार्यक्रम

**अलिबाग : प्रतिनिधी**

नॅशनल एज्युकेशन डेनिमित्त जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, रायगड आणि चिंतामणराव केळकर विद्यालय, अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने विधी साक्षरता आणि जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. हा उपक्रम केळकर विद्यालय येथे पार पडला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि सूत्रसंचालन विद्यालयाच्या शिक्षिका तृप्ती बोरे यांनी केले. त्यांनी विद्यार्थ्यांना कार्यक्रमाचे उद्दिष्ट आणि विधी साक्षरतेचे महत्त्व सांगितले.

असिस्टंट एलईडीसीएस ॲड. पियुष गडे यांनी नॅशनल एज्युकेशन डेचा संदर्भ सांगत मौलाना अबुल कलाम आझाद यांच्या शिक्षण क्षेत्रातील कार्याची आणि योगदानाची माहिती दिली. त्यांनी विद्यार्थ्यांना राइट्स ऑफ चिल्ड्रन म्हणजेच मुलांचे अधिकार, शिक्षणाचे मूल्य आणि त्याचा व्यक्तिमत्त्व विकासावर होणारा परिणाम याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.

यानंतर डेप्युटी चीफ एलईडीसीएस ॲड. मनीषा नागावकर यांनी विद्यार्थिनींना पोस्को कायदा, बालविवाह प्रतिबंध कायदा तसेच महिलांवरील अत्याचार प्रतिबंधक कायदा याविषयी मार्गदर्शन केले. त्यांनी सांगितले की मुलींचे विवाहासाठी वय किमान १८ वर्षे आणि मुलांचे २१ वर्षे असावे तसेच ११२ हा टोल-फ्री क्रमांक वापरून पोलिस आणि वैद्यकीय मदत कशी मिळवता येते आणि कामाच्या ठिकाणी महिलांवरील अत्याचारांच्या घटनांमध्ये तक्रार कशी करावी याची माहिती दिली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वरिष्ठ दिवाणी न्यायाधीश तथा सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, रायगड तेजस्विनी निराळे या होत्या. आपल्या अध्यक्षीय भाषणात त्यांनी बालविवाहमुक्त भारत या संकल्पनेवर भर देत बालविवाह प्रतिबंधक कायद्याचे महत्त्व विशद केले.

बालविवाह घडवून आणणे किंवा प्रोत्साहन देणे हे गुन्हा असल्याचे सांगून त्यांनी विद्यार्थ्यांना '१०९८' या चाइल्डलाइन क्रमांकावर तक्रार नोंदविण्याचे आवाहन केले तसेच जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे कार्य, नागरिकांसाठी तसेच मुलांसाठी उपलब्ध मोफत कायदेशीर मदत आणि जनजागृती कार्यक्रमांची माहिती दिली.

उपस्थितांचे आभार चिंतामणराव केळकर विद्यालयाच्या शिक्षिका तृप्ती बोरे यांनी मानले. त्यांनी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे आभार मानत अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये कायद्याबद्दल जागरूकता वाढते असे नमूद केले.

# मुरूडमध्ये रक्तदान, नेत्र तपासणी शिबिरास प्रतिसाद

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड पद्मदुर्ग लीग, वसंतराव नाईक कला व वाणिज्य महाविद्यालय, लायन्स क्लब मुरूड यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिर, मोफत नेत्र तपासणी आणि मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी दैवज्ञ ब्राह्मण सोनार समाजाचे महिला अध्यक्ष वासंती उमरोटकर यांनी या उपक्रमाचे कौतुक केले.



उपक्रमाची सुरुवात मुरूड पद्मदुर्ग लीगचे अध्यक्ष प्रकाश चव्हाण यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून करण्यात आली. या वेळी लायन्स क्लबचे अध्यक्ष सनी सोगावकर, मकरंद कर्णिक, वसंतराव नाईक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जनार्दन कांबळे, सी.एम. ठाकूर, रूपेश पाटील, चेतन माळी, रूपेश जामकर, श्रीशैल बहिरगुडे, गजानन मुनेश्वर, सीमा नाहिद, ॲड.मृणाल खोत, प्रमिला माळी, ॲड.इस्माईल घोले, संदीप गोणबरे, युवराज भगत,अभिराज चौलकर, नितिन पुलेकर, रक्त संक्रमण अधिकारी डॉ. दीपक गोसावी, आधिपारिचारक विशाल भगत, रक्तपेढी वैज्ञानिक अधिकारी सुनील बदिछोडे, समाजसेवा अधीक्षक नवनाथ अक्की, प्रयोगशाळा तज्ज्ञ अभिषेक घरत, माजी नगराध्यक्ष मंगेश दांडेकर, सोशल मीडिया सेलचे जिल्हा उपाध्यक्ष हसमुख जैन, महेश घाडगे, वसंतराव नाईक महाविद्यालय एनएसएस युनिट १०चे विद्यार्थी व पद्मदुर्ग लीगचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

या शिबिरात १२२ जणांनी रक्तदान केले. नेत्र तपासणी १०० जणांची करण्यात आली. यापैकी १२ मोतीबिंदू शस्त्रक्रिया रुग्ण असून येत्या मंगळवारी त्यांचे ऑपरेशन करण्यात येणार आहे. या वेळी स्वेच्छेने रक्तदान केल्याच्या सन्मानार्थ राज्य रक्त संक्रमण परिषद महाराष्ट्र राज्य प्रमाणपत्र तसेच ब्लॅकेंट्सचे वाटप पद्मदुर्ग लीगचे अध्यक्ष चव्हाण यांच्या हस्ते देण्यात आले.

# गाणी येथे महिलावर्गाकडून 'सखी जल्लोष'

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

ग्रुप ग्रामपंचायत गाणी, दि प्राईड इंडिया संस्था आणि महानगर गॅस लिमिटेड यांच्या संयुक्त विद्यमाने 'सखी जल्लोष २०२५' हा महिलांसाठी खास आयोजित कार्यक्रम नुकताच गाणी येथे उत्साहात पार पडला. गावातील महिला या जल्लोषात सहभागी झाल्या आणि त्यांनी विविध उपक्रमांतून आनंदोत्सव साजरा केला.




कार्यक्रमास उपविभागीय पोलीस अधिकारी सविता गर्जे यांच्या मार्गदर्शनाखाली दामिनी पथकातील कांचन जवान, ऋतुजा शिरतोडे, प्रतीक्षा कानवडे व गौरी शिंदे यांची विशेष उपस्थिती लाभली. महिलांच्या सुरक्षेबाबत असलेली संवेदनशीलता आणि तत्परता त्यांनी प्रत्यक्ष संवादातून महिलांपर्यंत पोहचवली.

दि प्राईड इंडिया संस्थेचे तालुका प्रकल्प समन्वयक किशोर शितोळे यांनी महिलांसाठी विशेष खेळ, मनोरंजनात्मक उपक्रम आणि कौशल्यविकासाच्या छोट्या प्रात्यक्षिकांद्वारे वातावरण अधिक रंगतदार केले. उपस्थित महिलांनी उत्साहात सहभाग नोंदवून सभागृह जल्लोषाने दणाणून सोडले.

स्पर्धात्मक उपक्रमांमध्ये उत्तम कामगिरी करणाऱ्या विजेत्यांना स्मार्ट वॉच, सोलर लॅम्प व थर्मास वॉटर बॉटल्स देण्यात आल्या.

या कार्यक्रमास ग्रामस्थ मंडळाचे अध्यक्ष रमेश धाडवे, उपसरपंच सुभाष उजळ, सुदाम शेडगे, आत्माराम रहाटवल तसेच दि प्राईड इंडिया संस्थेचे राज कावनकर, आर्यन येलवे आणि तालुक्यातील सर्व समन्वयक उपस्थित होते.

# पाच्छापुरात बुद्ध विहाराचे उद्घाटन

**पाली : प्रतिनिधी**

बौद्ध विकास मंडळ पाच्छापूर पंचशील नगर, तालुका सुधागड, जि. रायगड, मुंबई मध्यवर्ती कमिटी आणि ग्रामस्थ कमिटी यांच्या वतीने कार्तिक पौर्णिमेला नालंदा बुद्ध विहाराचा शानदार उद्घाटन आणि मूर्ती स्थापना सोहळा नुकताच पार पडला.

मुंबई मध्यवर्ती कमिटी आणि ग्रामस्थ कमिटी यांच्या संयुक्त विद्यमाने इ.स. १९७८ रोजी नालंदा बुद्धविहाराची स्थापना झाली होती. या विहाराचे नुतनीकरण करून हे विहार सुसज्य भव्य व सर्वांगसुंदर करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान राजेंद्र महाडिक यांनी भूषविले.

प्रस्तावना बौद्धाचार्य भीम महाडिक यांनी केली. बौद्ध विहाराचे उद्घाटन आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ कार्यकर्ते मारुती महाडिक, आरपीआय नेते, ज्येष्ठ विचारवंत श्याम डिंगळे यांच्या हस्ते करण्यात आले. सूत्रसंचालन राकेश महाडिक, सिद्धांत गायकवाड, ॲड. अक्षय डिंगळे यांनी केले.

या वेळी भन्तेजी यांच्या उपस्थितीत पूजा विधी करण्यात आला. कार्यक्रमाचे औचित्य साधून धम्म प्रवचनकार नूतन नरेश शिंदे यांचे बुद्ध विहारे बुद्ध नगरीतील धम्म प्रचाराची व आदर्श माणूस घडविण्याची केंद्र बनली पाहिजेत या विषयावर, तर नितीन जाधव यांनी अंधश्रद्धा व कर्मकांड या विषयावर प्रबोधन केले.

या प्रसंगी आंबडेकरी व धम्म चळवळीत योगदान देणाऱ्या कार्यकर्त्यांचा सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

कार्यक्रमास मारुती गायकवाड, दीपक पवार, संतोष महाडिक, दीपक गायकवाड, छगन शिर्के, नरेश शिंदे, प्रभाकर गायकवाड, राजेश गायकवाड, रोहिणी जाधव, नूतन शिंदे, बौद्धाचार्य के.टी. गायकवाड, जी.जी.मोरे, चंद्रगुप्त भालेराव, नारायण जाधव, अशोक वाघमारे, राजेश गायकवाड, भीम महाडिक, वंदीप जाधव, आनंद जाधव तसेच आंबेडकरी अनुयायी, धम्म बांधव, बहुजन बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गांगवली शाळेत विद्यार्थ्यांना टी-शर्ट वाटप




**माणगाव : प्रतिनिधी**

सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रात आग्रेसर असणाऱ्या माणगाव चारिझेन फाउंडेशनतर्फे तालुक्यातील जिल्हा परिषद शाळा गांगवली येथील विद्यार्थ्यांना शुक्रवारी (दि.७) टी-शर्ट वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमास उपस्थित फाउंडेशनचे सर्व पदाधिकारी व सामाजिक कार्यकर्ते यांचे शाळेतर्फे मुख्याध्यापक अशोक जाधव, शिक्षिका नेहा जाधव व विद्यार्थ्यांनी स्वागत केले.

आजचे विद्यार्थी हे उद्याच्या भारताचे भावी नागरिक असून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी फाऊंडेशन कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन फाउंडेशनचे अध्यक्ष कॅप्टन निर्मलसिंग रंधावा यांनी केले.

सुरुवातीला फाउंडेशनचे मार्केटिंग हेड राकेश पडवळ यांनी फाउंडेशनतर्फे राबविण्यात येणाऱ्या सामाजिक, शैक्षणिक उपक्रमांची माहिती दिली. सामाजिक कार्यकर्ते भूषण सिसोदे यांनी फाउंडेशनच्या माध्यमातून हाती घेतलेल्या सामाजिक उपक्रमांचे कौतुक करीत विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमास फाउंडेशनचे सदस्य कोशोर झेमसे, शाळेचे शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गुरू नानक जयंती साजरी

**माणगाव : बातमीदार**

शिख धर्माची स्थापना करणारे व धर्माचे प्रथम गुरु संत गुरू नानक जयंती नुकतीच जवाहर नवोदय विद्यालय, निजामपूर येथे प्रभातकालीन प्रार्थना सभेत साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाचे संचालन शाळेतील विद्यार्थी आदित्य जाधव यांनी केले. विद्यार्थी हर्ष दळवी याने संत गुरु नानक यांच्या जीवनावर माहिती दिली. शिक्षिका सुश्री नमिता आचार्य यांनी गुरु नानक यांच्या जीवनावर विद्यार्थ्यांना माहिती सांगितलली. प्रभारी प्राचार्य वैभव तुंगीकर यांनीही प्रकाश टाकण्यात आला. या वेळी कर्तव्यावर उपस्थित असलेले शिक्षक उपस्थित होते.

# मोरे महाविद्यालयात 'वंदे मातरम्'चा शतकोत्तर सुवर्ण महोत्सव उत्साहात

**पोलादपूर : प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता विभाग आणि सांस्कृतिक विभाग यांनी दिलेल्या निर्देशानुसार पोलादपूर तालुक्यातील वंदे मातरम् गीताचा शतकोत्तर सुवर्ण महोत्सव शुक्रवारी शिवाई शिक्षण प्रसारक मंडळ, महाड संचलित चोळई येथील सुंदरराव मोरे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या क्रीडांगणावर समूह गायनासह आयटीआय पोलादपूरच्या पथनाट्याद्वारे देशभावना प्रकट करणारा ठरला.

या वेळी व्यासपीठावर पोलादपूरचे तहसीलदार कपिल घोरपडे, सहाय्यक पोलीस निरीक्षक आनंद रावडे, गटशिक्षणाधिकारी सुभाष साळुंखे, शिवाई शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ॲड. संतोष काळे, प्राचार्य प्रा.सुनील बलखंडे, प्रमुख संयोजक व आयटीआयच्या प्राचार्य श्रीमती चारूलता बढीये तसेच वंदे मातरम समूह गायन संयोजन समिती सदस्य व महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबईचे कोकण विभागीय अध्यक्ष ज्येष्ठ पत्रकार शैलेश पालकर, आयटीआयचे स्थानिक सदस्य प्रमोद दीक्षित, उद्योजक शिरीष साबळे, प्रिती बुटाला, सामाजिक कार्यकर्त्या अस्मिता पवार, वृत्तपत्रविक्रेते दिलीप साबळे, साहित्यिका अरुणा भागवत, संजय कळंबे, गिरीधर दरेकर, सुभाष अधिकारी, स्मिता पवार, किसन सुरवसे, मुख्याध्यापक साळुंखे इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

या वेळी उपस्थित विद्यार्थी आणि नागरिकांनी तसेच राकेश सावंत, रुपाली चिकणे, सरिता कदम, शिल्पा शिंदे यांनी सुश्राव्य वंदे मातरम् गीत गायन सादर केले. त्यास उपस्थितांनी दाद दिली.





# वंदे मातरम् गीताची खालापूरमध्ये धून

**चौक : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील विविध तंत्रनिकेतन, महाविद्यालय, शासकीय यंत्रणा यामध्ये वंदे मातरम् या राष्ट्रीय गीताचा शतकोत्तर सुवर्ण महोत्सव दिन उत्साहात साजरा करण्यात आला. स्व. बंकिमचंद्र चटर्जी रचित या राष्ट्रीय गीताच्या निर्मितीला १५० वर्षे पूर्ण झाल्याबद्दल विशेष कार्यक्रम घेण्यात आला. राज्यातील विविध तंत्रनिकेतन, महाविद्यालय, शाळा या मध्ये रोज वंदे मातरम् या गीत गायले जाते, परंतु १५० वर्षपूर्तीचे औचित्य साधून सर्व तंत्रनिकेतन, महाविद्यालयांमधून संपूर्ण वंदे मातरम्चे गायन व्हावे व या गीताचा इतिहास सांगणारे प्रदर्शन दर्शनी भागात लावून हा दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

वंदे मातरम् राष्ट्रीय गीताचे समूह गायन घेण्यात आले तसेच या गीताच्या इतिहासाविषयी माहिती देणारी प्रदर्शनी आयोजित करण्यात आली. समारंभासाठी निवासी नायब तहसीलदार विकास पवार, विस्तार अधिकारी शैलेंद्र तांडेल, व्यवस्थापन समितीचे सदस्य, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मुरूडमध्ये विद्यार्थ्यांनी आळवला वंदे मातरम्चा स्वर

**मुरूड : प्रतिनिधी**

कौशल्य रोजगार उद्योजकता आणि नाविन्यता विभाग व सांस्कृतिक कार्य विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने व संयोजन समिती मुरूड व शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था यांनी वंदे मातरम् गीत वर्धापन दिनानिमित्त मुरूड येथील सर एस.ए. विद्यालयाच्या भव्य मैदानावर तालुक्यांतील शाळा, महाविद्यालयातील हजारो विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यास उत्तम प्रतिसाद लाभला.



या कार्यक्रमास तहसीलदार आदेश डफळ, वरिष्ठ पोलीस निरीक्षक परशुराम कांबळे, मुख्याध्यापक सरोज राणे, पर्यवेक्षक प्रा. भास्कर मोरे, समिती सदस्य प्रा. एम.एस जाधव, संजय ठाकूर, अंकेश पाटील, आशिलकुमार ठाकूर, दीपिका रोटकर, संदेश चोरघे, किरण देशमुख, स्वप्नील नाक्ती आदी उपस्थित होते.

या वेळी वीर कोंडाजी फर्जंद औ.प्र. संस्थेच्या प्रशिक्षणार्थीनी वंदे मातरम् या राष्ट्रीय गीताच्या आधारावर क्रांतिकारकांनी दाखविलेले शौर्य, धैर्य आणि देशप्रेम व्यक्त करणारे बहारदार नाट्य सादर करून देशभक्ती जागवली. सहशिक्षिका दीपाली रोटकर यांनी वंदे मातरम् गीताची महती वर्णन करताना क्रांतिकारकांची प्रेरणादायी गाथा देशाच्या एकता आणि अखंडतेसाठी सदैव स्फूर्तिदायी ठरेल, असा विश्वास व्यक्त केला.

समारोप करताना आदेश डफळ यांनी, वंदे मातरम् हे गीत स्वातंत्र्याचा उद्घोष तथा असंख्य वीरांच्या संघर्षाची प्रेरणा असून त्याचे नित्य स्मरण केले पाहिजे, असे आवाहन केले .

या कार्यक्रमात तालुक्यातील जिल्हा परिषद शाळा, नगर परिषद शाळा, सर एस.ए. हायस्कूल, अंजुमन इस्लाम हायस्कूल, वसंतराव नाईक महाविद्यालय, नजिकेता हायस्कूल, सुविद्या विद्यालय, ओंकार विद्यामंदिर, आयटीआय विहूर आदी ठिकाणचे विद्यार्थी सहभागी झाले होते.

या वेळी विविध स्पर्धातील बक्षीसप्राप्त विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संदेश चोरघे यांनी केले, तर उपस्थितांचे आभार स्वप्नील गुंजाळ यांनी मानले.

### ऑस्ट्रेलियात खराब हवामानामुळे सामना रद्द

# भारताने टी-२० मालिका जिंकली




**ब्रिस्बेन : वृत्तसंस्था**

भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेतील पाचवा आणि शेवटचा सामना पावसामुळे वाया गेला. त्यामुळे भारतीय संघाने मालिका २-१ अशी जिंकली. सन २००८पासून भारताने ऑस्ट्रेलियात एकही टी-२० मालिका गमावलेली नाही.

नाणेफेक जिंकून ऑस्ट्रेलियाने प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला, मात्र सामन्याची पाच षटके झाल्यानंतर खराब हवामानामुळे खेळ थांबवण्यात आला. खेळ थांबला त्या वेळी भारताच्या ४.५ षटकात बिनबाद ५२ धावा झाल्या होत्या. सलामीवीर अभिषेक शर्मा २३ धावांवर, तर शुभमन गिल हा १६ चेंडूत २९ धावा करून नाबाद होता.


हा सामना ब्रिस्बेनमध्ये ऐतिहासिक गाबा मैदानावर खेळवला जात होता, पण ४.५ षटकांनंतर पंचांनी अचानक सामना थांबवला. त्यानंतर ग्राउंड स्टाफने सर्व खेळाडूंना डगआउट सोडून ड्रेसिंग रूममध्ये जाण्यास सांगितले, तर प्रेक्षकांनाही जागेवरून उठवून आतमध्ये पाठवण्यात आले, ज्यामुळे सर्वच जण तणावात दिसले.

खराब हवामानामुळे सामना अचानक थांबवण्यात आला. पंच शॉन क्रेग यांनी आजूबाजूला पाहिले आणि लगेचच खेळाडूंना पॅव्हेलियनमध्ये परतण्याचे आदेश दिले. याचे मुख्य कारण म्हणजे स्टेडियमजवळील काही भागात विजा चमकताना दिसल्या आणि हवामानशास्त्रज्ञांच्या अहवालांमुळे सर्वांना सावध केले. ब्रिस्बेनमधील हवामान अनेकदा असंच रौद्ररूप धारण करत. सामना थांबवल्यानंतर काही वेळाने अचानक वादळी वाऱ्यासह जोरदार पावसाला सुरुवात झाली. ऑस्ट्रेलियामध्ये, खेळाडू आणि चाहत्यांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देऊन खराब हवामानामुळे अनेकदा सामने रद्दही करण्यात आले आहेत.

## अभिषेक शर्माचा नवा विश्वविक्रम

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेतील पाचव्या



आणि अखेरच्या टी-२० सामन्यात अभिषेक शर्माने विश्वविक्रमाला गवसणी घातली. भारताच्या डावाची सुरुवात करताना या सामन्यात ११ धावा पूर्ण करताच अभिषेकने आंतरराष्ट्रीय टी-२०मध्ये एक हजार धावांचा टप्पा गाठला. सर्वात कमी चेंडूत हा डाव साधत त्याने विश्वविक्रम आपल्या नावे केला.

आंतरराष्ट्रीय टी-२० क्रिकेटमध्ये सर्वात कमी चेंडूत एक हजार धावा करणाऱ्या फलंदाजांच्या यादीत याआधी सूर्यकुमार यादव अव्वलस्थानावर होता. अभिषेक शर्माने याचा विक्रम मोडीत काढत नवा विश्वविक्रम प्रस्थापित केला आहे. भारताच्या युवा स्फोटक बॅटरने ५२८ चेंडूचा सामना करताना अशी कामगिरी केली आहे. त्यासाठी सूर्यकुमारने ५७३ चेंडू खेळले होते.

दरम्यान, भारताकडून आंतरराष्ट्रीय टी-२० क्रिकेटमध्ये सर्वात कमी डावांत एक हजार धावा करणाऱ्या फलंदाजांच्या यादीत विराट कोहली आघाडीवर आहे. त्याने २७ डावांत अशी कामगिरी करून दाखवली होती. अभिषेक शर्माने त्याच्यापेक्षा एक डाव अधिक घेत या यादीत दुसरे स्थान पटकावले आहे.



## रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांची विभागस्तरीय रग्बी स्पर्धेसाठी निवड

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी जिल्हास्तरीय रग्बी स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकाविला. त्यामुळे या संघाची विभागीय स्तरावरील स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

राज्य क्रीडा व युवक सेवा संचालनालय अंतर्गत रायगड जिल्हा क्रीडा अधिकारी आणि पनवेल महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने या रग्बी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयाच्या संघात अजित राजेंद्र झिने, करण दीपक सुरडकर, सुमित मुकेश चौधरी, मंथन महेश पाटील, ओंकार निलेश इंदुलकर, सलाउद्दीन झहीर पटेल, कुलदीप संजय सिंग, श्रेयश मोहन पुकाले, प्रथमेश शेषराव पालवे, प्रसाद अरविंद शिंदे, आयुश ब्रिजलाल सरोज, हरीश मनोज सिंग यांचा समावेश होता. त्यांना क्रीडा शिक्षक प्रवीण पाटील आणि संभाजी जाधव यांचे मार्गदर्शन लाभले.

या यशाबद्दल संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, कार्यकारी मंडळ संचालक संजय भगत, सचिव डॉ. एस.टी. गडदे, स्कूल कमिटी मेंबर प्रभाकर जोशी, प्राचार्य निशा नायर यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन व कौतुक केले तसेच पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## ऋषभ पंत पुन्हा जखमी

**बंगळुरू : वृत्तसंस्था**

भारतीय संघ १४ नोव्हेंबरपासून दक्षिण आफ्रिकेविरुद्ध दोन सामन्यांची कसोटी मालिका खेळणार आहे. या मालिकेसाठी यष्टीरक्षक-फलंदाज ऋषभ पंतचाही भारतीय संघात समावेश करण्यात आला आहे, मात्र त्याआधी पंतला आफ्रिका अ विरुद्धच्या सामन्यादरम्यान दुखापत झाली.

ऋषभ पंतला भारत अ संघाच्या दुसऱ्या डावात तीन वेळा चेंडू लागला, ज्यामुळे त्याला मैदान सोडावे लागले. रिव्हर्स हुक मारण्याचा प्रयत्न करताना त्याच्या हेल्मेटला चेंडू लागल्याने



पंतला प्रथम दुखापत झाली. त्यानंतर पुल शॉट मारण्याचा प्रयत्न करताना चेंडू त्याच्या डाव्या हाताला चेंडू लागला. थोड्याच वेळात एक चेंडू त्याच्या पोटात लागला. संघाचे फिजिओ तिन्ही वेळा मैदानावर आले. शेवटी त्याला मैदानात सोडण्याचा निर्णय घ्यावा लागला.

भारत अ संघाचा कर्णधार ऋषभ पंतने रिटायर हर्ट होण्यापूर्वी २२ चेंडूत १७ धावा केल्या, ज्यात दोन चौकार आणि एक षटकाराचा समावेश आहे. त्याने याआधी पहिल्या डावात २४ धावा केल्या होत्या. भारत अ संघाने त्यांच्या पहिल्या डावात २५५ धावा केल्या. प्रत्युत्तरादाखल दक्षिण आफ्रिका अ संघाचा पहिला डाव २२१ धावांवर सर्वबाद झाला, ज्यामुळे भारत अ संघाला पहिल्या डावाच्या आधारे ३४ धावांची आघाडी मिळाली.

भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील कसोटी मालिकेचा पहिला सामना १४ नोव्हेंबरपासून कोलकाता येथील ईडन गार्डन्स येथे खेळवला जाणार आहे.

## दिव्यांग एलआयसी चषक दिल्लीने जिंकला

**मुंबई : प्रतिनिधी**

लोकेश रावतच्या दणकेबाज नाबाद ९७ धावांच्या खेळीच्या जोरावर दिल्लीने दिवांग्य क्रिकेट चषक स्पर्धेत हरयाणाचा नऊ विकेट राखून पराभव करीत दणक्यात एलआयसी चषक जिंकला. देशातील १६ आघाडीचे संघ या स्पर्धेत सहभागी झाले होते.

मुंबईतील पी.जे.हिंदू जिमखान्यावर झालेल्या फायनलमध्ये हरयाणाने देवदत्तच्या नाबाद ६७ जोरावर १५ षटकात १५५ धावा केल्या. त्याला स्पर्धेत सातत्यपुर्ण कामगिरी करणाऱ्या गुलमदिनने (४४) चांगली साथ दिली. प्रत्युत्तरादाखल सलामवीर लोकेश कवटने ३८ चेंडूत नाबाद ९७



धावांची खेळी करत संघाला एकहाती विजय मिळवून दिला. त्यात १० सिक्स आणि पाच चौकारांचा समावेश होता. दिल्लीने ११ ओव्हरमध्ये एक विकेटच्या मोबदल्यात १५६ धावा करीत दिल्लीला विजेतेपद मिळवून दिले. रावतला मॅन ऑफ द मॅचच्या किताबाने गौरविण्यात आले.

स्पर्धेचे पारितोषिक वितरण भारताचे माजी कर्णधार दिलिप वेंगसरकर यांच्या हस्ते झाले. या वेळी ऑल इंडिया क्रिकेट असोसिएशन फॉर द फिजिकली चॅलेंज्ड संघटनेचे उपाध्यक्ष विनोद देशपांडे, अनिल जोगळेकर, खजिनदार राजेश पाटील, सचिव विनायक धोत्रे, वरिष्ठ सदस्य मीनल पोतनीस तसेच एलआयसीचे रीजिनल मॅनेजर राजेशकुमार सुखदेव, नरेंद्र सुर्वे, सदाशिव पटनाईक, पीआरओ संदेश भुटाला, महावितणचे संचालक वाघिरकर, क्रीडा उपसंचालक नवनाथ फडतरे उपस्थित होते.

### किशोर-किशोरी राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी कबड्डी स्पर्धा

# नाशिक, पुणे, नंदुरबार, परभणी, जालना, परभणी उपउपांत्य फेरीत

**पुणे : प्रतिनिधी**

नाशिक शहर, पुणे ग्रामीण, नंदुरबार, परभणी यांनी किशोरी, तर जालना, परभणी यांनी किशोर गटात ३६व्या किशोर किशोरी राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेच्या उपउपांत्य फेरीत धडक दिली.

पिंपरी चिंचवड बोपखेल येथील श्रीरंग धोदाडे क्रीडानगरीत कै. राकेशभाऊ घुले कबड्डी संघ व युवा प्रतिष्ठान संघ व विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांच्या वतीन आयोजित करण्यात आलेल्या चौथ्या दिवसातील सायंकाळच्या सत्रात गत विजेत्या नाशिक शहरने किशोरी विभागात रायगडचा ३४-२७ असा पाडाव केला. विश्रांतीला २३-५ अशी भक्कम आघाडी घेणाऱ्या नाशिककरांना विश्रांती नंतर मात्र रायगडने विजयासाठी चांगलेच झुंजविले. हेतल हिरे व धनश्री शिंदे यांच्या धारधार चढाया त्यांना मिळालेली दिपिका मौर्या





त्रिशना निमजे यांची पकडीची साथ यामुळे नाशिक शहरने पहिल्या डावात भक्कम आघाडी घेतली होती, मात्र दुसऱ्या डावात रायगडच्या अर्पिता चौहान, मलिका शिंदे यांनी कडवी लढत देत सामन्यातील रंगत वाढविली. पुणे ग्रामीण संघाने साताऱ्याचा ६६-२८ असा धुव्वा उडविला. पुर्वार्धात दोन व उत्तरार्धात तीन लोन देत पुणेकरांनी गुणांचे अर्धशतक पार केले. सानवी शिंदे, मानसी गावडे, सई जाधव यांच्या चतुरस्त्र खेळाला या विजयाचे श्रेय जाते. किशोर विभागात गतविजेत्या परभणीने नंदुरबारला ४७-३५ असे नमवित उपउपांत्य फेरी गाठली. परभणीचा बालाजी राठोड, राहुल चव्हाण, सुनील कांबळे यांच्या खेळाने विजय साकारला. नंदुरबारकडून शंतनु म्हस्के, संभव बनकर यांनी शर्तीची लढत दिली.

दुसऱ्या सामन्यात जालन्याने साताऱ्याचा ६४-३१ असा धुव्वा उडवत पराभव केला. निलेश राठोड, शिवाय गायकवाड, रोहन राठोड यांच्या चौफेर खेळाने पहिल्या डावात एक लोन देणाऱ्या जालन्याने दुसऱ्या डावात तीन लोन देत मोठा विजय साकारला. नंदुरबारकडून शिवम देसाई, आर्यन चव्हाण बरे खेळले. किशोर गटात पराभव स्वीकारत असताना किशोरी गटात मात्र नंदुरबारने पुणे शहर संघाला ३३-३१ असे चकवित आगेकुच केली. त्यांनी पुर्ण डावात १७ बोनस गुण कमविले. त्यामुळे त्यांना हा निसटता विजय मिळविता आला. निविता बोगती, वैष्णवी ठिगळे यांच्या झंजावती चढायांनी हा विजय शक्य झाला. पुणे शहरच्या रिया लावर्डे, निलम जाधव यांनी शेवटच्या क्षणापर्यंत कडवी लढत दिली.

याच विभागात परभणीने कोल्हापूरला ३४-३० असे परभूत केले. परभणीकडून सोनाली नवकीकर, यशश्री इंगोले, श्रावणी इंगोले, तर कोल्हापूरकून सायली कस्तूरे, सुहानी पाटील, कृष्णा वर्मा यांचा खेळ प्रेक्षणीय झाला.

## कबड्डीपटू विजय पाटील यांचे निधन

**मुंबई : प्रतिनिधी**



महाराष्ट्र तसेच बँक स्पोर्टस् बोर्डाचे राष्ट्रीय कबड्डी खेळाडू विजय पाटील यांचे अल्पशा आजाराने शुक्रवारी (दि. ७) पहाटेच्या सुमारास निधन झाले. ते ६५ वर्षाचे होते. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, मुलगा व मुलगी असा परिवार आहे.

लोअर परेलच्या वंदे मातरम् क्रीडा मंडळाकडून विजय पाटील यांनी कबड्डी खेळाला सुरुवात केली. एक उत्कृष्ट उजवा मध्यरक्षक अशी त्याची ख्याती होती. त्यांनी मुंबई तसेच महाराष्ट्राचेही प्रतिनिधित्व केले. कबड्डी खेळाबरोबर सामाजिक कार्यातदेखील ते अग्रेसर होते. त्यांच्या पार्थिवावर शनिवारी दुपारी मुंबईतील भोईवाडा येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या रूपाने कबड्डीतील एक गुणी खेळाडू हरपल्याची भावना व्यक्त होत आहे.

### हाँगकाँग सुपर सिक्सेस स्पर्धा

## भारतीय संघाचे एकाच दिवशी तीन लाजिरवाणे पराभव

**हाँगकाँग : वृत्तसंस्था**

हाँगकाँगमध्ये सुपर सिक्सेस स्पर्धेत भारतीय संघाने शुक्रवारी पाकिस्तानवर डकवर्थ लुईस नियमानुसार विजय मिळवला, पण शनिवारी (दि. ८) भारताला कुवेत, यूएई आणि नेपाळकडूनही पराभवाचा सामना करावा लागला.

नवख्या नेपाळ संघाने भारतीय संघावर एकतर्फी विजयाची नोंद केली. पहिल्या डावात फलंदाजीला आलेल्या नेपाळच्या फलंदाजांनी भारतीय गोलंदाजांची चांगलीच धुलाई केली. चौकार आणि षटकारांचा पाऊस पाडत नेपाळने अवघ्या सहा षटकांत १३७ धावांचा डोंगर उभारला. या धावांचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या भारतीय फलंदाजांना अवघ्या ४५ धावांपर्यंत मजल मारता आली. हा सामना नेपाळने ९२ धावांनी आपल्या नावावर केला.

दुसऱ्या सामन्यात कुवेतने प्रथम फलंदाजी करताना सहा षटकांत १०६ धावा केल्या होत्या. कुवेतकडून फलंदाजी करताना यासिन पटेलने १४ चेंडूत ५८ चेंडूंची स्फोटक खेळी केली, तर बिलाल ताहीरने. २५ धावा केल्या. भारतीय संघाला हा सामना जिंकण्यासाठी १०७ धावा करायच्या होत्या, पण भारतीय संघाला ५.४ षटकात अवघ्या ७९ धावा करता आल्या. भारताकडून अभिमन्यू मिथुनने २६ धावांची खेळी केली.

नेपाळ आणि कुवेतसह भारतीय संघाला यूएईकडूनही पराभवाचा सामना करावा लागला. पहिल्या डावात फलंदाजी करताना भारतीय संघाने तीन गडी बाद १०७ धावा केल्या होत्या. भारताकडून फलंदाजी करताना अभिमन्यू मिथुनने ५० धावांची खेळी केली, तर दिनेश कार्तिकने ४२ धावा चोपल्या. या धावांचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या यूएईकडून कर्णधार खालिद शाहने १४ चेंडूत ५० धावांची खेळी करून विजय मिळवून दिला.

## सुनील छेत्रीची आंतरराष्ट्रीय फुटबॉलमधून निवृत्ती

**चेन्नई : वृत्तसंस्था**

भारतीय फुटबॉल संघाचा माजी कर्णधार, स्टार स्ट्रायकर सुनील छेत्री याने भारतीय संघ एएफसी आशियाई कप २०२७च्या पात्रता फेरीतून बाहेर पडल्यानंतर आपली आंतरराष्ट्रीय कारकीर्द संपल्याची घोषणा केली आहे. एका वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत छेत्रीने भारत एशियन कप २०२७साठी पात्र न ठरल्यामुळे आपण आंतरराष्ट्रीय कारकिर्दीला पूर्णविराम दिल्याचे स्पष्ट केले.

आंतरराष्ट्रीय फुटबॉलमधून जरी निवृत्ती स्वीकारली असली, तरी छेत्री अजूनही क्लब फुटबॉलमध्ये खेळत राहणार आहे. त्याने नुकताच



बंगळुरू एफसीसोबत नवीन करार केला आहे.

४१ वर्षीय छेत्री हा भारताकडून सर्वाधिक गोल करणारा खेळाडू आहे. त्याने १५७ आंतरराष्ट्रीय फुटबॉल सामन्यांत ९५ गोल केले आहेत. त्याने यापूर्वी जून २०२४मध्ये कोलकाताच्या सॉल्ट लेक स्टेडियमवर निरोप समारंभाच्या सामन्यानंतर आंतरराष्ट्रीय फुटबॉलमधून निवृत्ती जाहीर केली होती.

## आशिया चषकासाठी आयसीसीने स्थापन केली समिती

**दुबई : वृत्तसंस्था**

आशिया कप २०२५नंतर निर्माण झालेल्या भारत आणि पाकिस्तानमधील ट्रॉफी वाद सोडवण्यासाठी आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने (आयसीसी) एक विशेष समिती स्थापन केली आहे. टेलिकॉम एशिया स्पोर्टच्या रिपोर्टनुसार ओमान क्रिकेट बोर्डाचे अध्यक्ष पंकज खिमजी हे या समितीचे अध्यक्ष असतील.

आशिया कप २०२५च्या अंतिम सामन्यात भारताने पाकिस्तानवर दणदणीत विजय मिळवला. बक्षीस वितरण सोहळ्यावेळी पाकिस्तान क्रिकेट बोर्ड (पीसीबी) प्रमुख मोहसिन नक्वी यांनी विजेत्या भारतीय कर्णधार सूर्यकुमार यादवला ट्रॉफी देण्याचा प्रयत्न केला. सूर्यकुमारने ट्रॉफी स्वीकारण्यास नकार दिला, कारण नक्वी हे पाकिस्तानचे गृहमंत्री असल्याने आणि त्यांनी भारतात दहशतवादाला पाठिंबा देण्याच्या त्यांच्या भूमिकेबद्दल आक्षेप घेण्यात आले होते, तर मी आशियाई क्रिकेट परिषदेचे (एसीसी) अध्यक्ष असल्याने मलाच विजयी संघाला ट्रॉफी देण्याचा अधिकार आहे, असा हेक्का नक्वी यांनी कायम ठेवला. त्यानंर सूर्यकुमारने ट्रॉफी न स्वीकारता विनोदाने काल्पनिक ट्रॉफी धरून आपल्या सहकाऱ्यांसह आनंद साजरा केला होता.

मोहसिन नक्वी यांनी नंतर १० नोव्हेंबर रोजी दुबईमध्ये झालेल्या समारंभात बीसीसीआयला ट्रॉफी स्वीकारण्याचा प्रस्ताव दिला, परंतु बीसीसीआयने नकार दिला तसेच आयसीसी बोर्डाच्या बैठकीत औपचारिकपणे हा मुद्दा उपस्थित केला. सूत्रांनी म्हटले आहे की, या बैठकीत ऑस्ट्रेलिया, इंग्लंड आणि दक्षिण आफ्रिकासारख्या बोर्डांनी दोन्ही देशांना शांत करण्याचा प्रयत्न केला. ट्रॉफी वाद सोडवण्यासाठी त्यांनी तीन सदस्यीय समिती स्थापन करण्यास सहमती दर्शविली.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com